।। विद्या अमृतम् अश्नुते ।।

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचालित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय

पाचल - रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न




नॅक पुनर्मूल्यांकन 'बी' श्रेणी

ISO 9001:2015 व ISO 29993:2017 प्रमाणित

# सह्यगिरी

२०२४-२५

# प्राध्यापक वृंद २०२४-२५



प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम



सहा. प्रा. एस. व्ही. निंबाळकर



सहा. प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील



सहा. प्रा. डॉ. ए. डी. पाटील



सहा. प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे



सहा. प्रा. एस. एस. धोंगडे



सहा. प्रा. एन. जी. देवन



डॉ. एम. आर. कोंडागुर्ले



सहा. प्रा. कु. एस. जी. चव्हाण (हंगामी)



सहा. प्रा. कु. एम. डी. देवरुखकर (हंगामी)



सहा. प्रा. पी. पी. राठोड (हंगामी)

# कार्यालयीन कर्मचारी



श्री. आर. ए. चव्हाण
वरिष्ठ लिपिक



श्री. एस एल. सक्रे
कनिष्ठ लिपिक



सौ. एस. व्ही. कोलते
ग्रंथालय परिचर



श्री. एस. एम. पालकर
शिपाई



श्री. एम. बी. साटम
शिपाई



श्री. बी. टी. जाधव
शिपाई



श्री. जी. एच. मदगे
शिपाई

# संचालक मंडळ



मा. श्री.
## मनोहर हरी खापणे
### अध्यक्ष

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल, राजापूर



मा. श्री. **शंकरराव चव्हाण**
उपाध्यक्ष



मा. श्री. **नरेश पाचलकर**
सरचिटणीस



मा. श्री. **संजय जोशी**
सहचिटणीस



मा. श्री. **प्रदीप खापणे**
खजिनदार



मा. श्री. **विजय सावंत**
सदस्य



मा. श्री. **चंद्रकांत लिंगायत**
सदस्य



मा. श्री. **अशोक सक्रे**
सदस्य



मा. श्री. **सिध्दार्थ जाधव**
सदस्य

*With Best Compliments From*

# AARYAN CLEARING AGENCY

CUSTOM BROKER LICENCE NO - APOPK7553BCH001 (11/2094)



## Mr. MANOHAR KHAPANE

**Director**

**Mobile: 9820234861**

1302, 13th Floor, Real Tech Park, Plot No. 39/2,
Sector - 30A, Vashi, Navi Mumbai - 400 703.

Tel: 022-2781 4922 / 23 /24 | Dir.: 022-2781 5900 | Fax: 022-2781 6363

Email: aaryanclearing@gmail.com

# आमचे प्रेरणास्थान व प्रमुख आधारस्तंभ



## मा. श्री. मनोहर हरी खापणे

(प्रसिद्ध उद्योगपती)

- अध्यक्ष -

**सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल**

# ◈ प्राचार्यांचे मनोगत ◈

येणाऱ्या नव्या आव्हानांना कवेत घेऊन नवा समाज घडविण्यासाठी ज्ञानयज्ञ सतत तेवत ठेवणारे आमचे महाविद्यालय निसर्गरम्य अशा सुंदर परिसरात वसलेले आहे. असंख्य आव्हानांना सामोरे जात महाविद्यालय नॅकच्या तिसऱ्या सायकलला सामोरे गेले असून बी ग्रेड कायम ठेवण्यात यश मिळवले आहे. यावर्षापासून सुरू झालेल्या नवीन शैक्षणिक धोरणाचा अंगीकार केला असून नवशैक्षणिक धोरणाचे प्रथम वर्ष यशस्वीपणे संपन्न झाले आहे. या दोन्ही गोष्टी आमच्यासारख्या ग्रामीण भागातील महाविद्यालयाला पूर्ण करणे आव्हानात्मक होते, पण संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणेसाहेब आणि त्यांचे सर्व संस्था पदाधिकारी, सहकारी, सभासद, हितचिंतक, सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि आजी-माजी सर्व विद्यार्थ्यांच्या बळावर आम्ही या दोन्ही आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जात यश संपादन केले आहे . महाविद्यालयाने गतवर्षी केलेल्या नियोजनाचा कृतीत आणलेला पध्दतशीर आराखडा म्हणजेच महाविद्यालयाचा 'सह्यगिरी' हा वार्षिक अंक होय. महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणजे नव आशा आकांक्षेचा अंकुरच होय. आपल्या प्रतिभा बळावर आणि आपल्यातील ध्येयवादाने नवभारत घडवू पाहणारा हा देशाच्या उज्वल भवितव्याचा पायाच होय. या तरुणाईने आपल्या सिद्धहस्त लेखणीतून टिपलेले भोवतालचे सर्व विषयावरील लेखन म्हणजेच हा आमचा वार्षिकांक होय. हा अंक आपल्या हाती सुपूर्द करताना आम्हाला अपूर्व आनंद होत आहे.

परिसरातील विद्यार्थ्यांच्या घराघरात उच्च शिक्षणाची गंगा घेऊन जाणारे भगीरथ म्हणून आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणेसाहेब यांना ओळखले जाते. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांचे हे कार्य गेली तीस वर्षाहून अधिक काळ अविरत सुरू आहे. या परिसरातील विद्यार्थी, पालक यांचेही या कामी अनमोल सहकार्य होत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय अविरत धडपडत आहे.

यातूनच संपूर्ण वर्षभर आमच्या महाविद्यालयात उपक्रमांची रेलचेल सुरू असते. महाविद्यालयात दि. २० ते २२ मार्च २०२५ या कालावधीत राष्ट्रीय परिषद ऑफलाईन आणि ऑनलाईन अशा दोन्ही मोडवर संपन्न झाली. या परिषदेस मुंबई विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदेश वाघ, डॉ संतोष बनसोड, मुंबई विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सतीश कामत, प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग, अमेरिका स्थित डॉ. सत्या सर आदी मान्यवरांनी या परिषदेला संबोधित केले. महाविद्यालयाचा व्दितीय वर्ष वाणिज्यचा विद्यार्थी शुभम गोरुले यांने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या राज्यस्तरीय आव्हान शिबिरात अमरावती येथे यशस्वीपणे सहभाग नोंदवला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या येरडव येथे झालेल्या विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात शिवकालीन ऐतिहासिक पायवाट संरक्षित करण्यात आली. याची दखल विविध वर्तमानपत्रांनी व पुरातत्व खात्याने घेतली आहे. याबरोबरच या विभागामार्फत वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, रस्तासुरक्षा

अभियान, नव मतदार नाव नोंदणी व मतदार जनजागृती अभियान असे विविध उपक्रम घेण्यात आले. 'स्वच्छता हीच सेवा' हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. सांस्कृतिक विभागामार्फत महापुरुषांच्या जयंत्या, पाककृती स्पर्धा, प्रश्नमंजुषा, सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध उपक्रम घेण्यात आले. महिला विकास कक्षामार्फत सावित्रीबाई फुले जयंती, महिला दिन, गरीब व गरजू मुलींना मोफत एस. टी. पास सुविधा आदी उपक्रम संपन्न झाले. ग्रंथालय विभागामार्फत बुक रिव्ह्यू, बेस्ट रीडर आदी स्पर्धांबरोबरच रंगनाथन जयंती, ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती हे उपक्रम संपन्न झाले. स्पोर्ट विभागामार्फत क्रीडा स्पर्धा, अँटी रॅगिंग सेलचे प्रबोधनात्मक उपक्रम, स्कॉलरशिप विभागामार्फत विविध स्कॉलरशिपची माहिती आणि ती विद्यार्थ्यांना मिळावी यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच महाविद्यालयात स्वयंम रोजगार उपलब्ध करून देणारे नवीन दोन कोर्स सुरू आहेत. महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या सर्व विभागांमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. त्यामुळे महाविद्यालयाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत असून यासाठी सदैव झटणारे संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष मा. मनोहरजी खापणेसाहेब, त्यांचे सहकारी, सर्व संस्था पदाधिकारी, सभासद आणि हितचिंतक बंधूंचे असेच अनमोल सहकार्य यापुढेही लाभू दे. आम्हावरली या सर्वांची कृपादृष्टी अशीच अखंड राहू दे. या अंकाच्या पूर्णत्वासाठी झटणाऱ्या सर्व घटकांचे मनस्वी आभार!

मनःपूर्वक धन्यवाद!



**- डॉ. प्रमोद एस. मेश्राम**

प्रभारी प्राचार्य

# ◈ संपादकीय... ◈

आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटना, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घडामोडी, त्याचा स्थानिक जीवनावर होणारा परिणाम या साऱ्यामुळेच संवेदनशील तरुणाई अस्वस्थ होत आहे. राजकारणातली हरवत चाललेली नीतिमत्ता, नात्यातील संपत चाललेला प्रेमाचा ओलावा, समाजाची हरवत चाललेली एकरूपता, समूह भावनेचे कोसळतेपण, मोठ्या प्रमाणात होत असलेली पर्यावरणाची हानी, आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असणारी लहान मोठी युद्धे या साऱ्याचाच परिणाम सजग तरुणांवर होतो आहे. त्यांचे अनुभव विश्वव्यापक होत असताना त्यांच्यातील सर्जनशीलतेला हक्काचे व्यासपीठ देण्याचा प्रयत्न महाविद्यालय करते. सह्यगिरी हा वार्षिक अंक म्हणजे महाविद्यालयाच्या तरुणाईने शब्दबध्द केलेले आपले अनुभव विश्व होय.

महाविद्यालयाचा सह्यगिरी वार्षिक अंक आज वाचकांच्या हाती सोपवताना मन आनंदून जात आहे. महाविद्यालयाच्या चौफेर प्रगतीचा आलेख म्हणजेच 'सह्यगिरी' हा वार्षिक अंक होय. महाविद्यालयाचे नॅक यावर्षी संपन्न झाले. संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणेसाहेब, सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर,सर्व संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी,आजी-माजी विद्यार्थी,पालक, हितचिंतक आणि समाजातील सर्व घटक यांच्या सहकार्याने महाविद्यालयाने 'बी' ग्रेड प्राप्त करत आपल्या प्रगतीची मोहर उमटवली. विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळवलेले यश, प्राध्यापकांनी केलेले संशोधन , माजी विद्यार्थी आणि पालक यांचे लाभलेले अनमोल सहकार्य या साऱ्यांचाच शब्द संभार म्हणजे 'सह्यागिरी' हा वार्षिक अंक होय. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि परिसराच्या सामाजिक जडणघडणीसाठी महाविद्यालय अविरत प्रयत्न करत आहे. विद्यार्थी विविध क्षेत्रात नैपुण्य प्राप्त करत आहेत. महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यापीठस्तरीय विविध कमिटीत काम करत आहेत. महाविद्यालय आणि समाज यांच्यातील शब्दांकित संवाद म्हणजे 'सह्यगिरी' वार्षिक अंक होय. प्रतिभावंत विद्यार्थ्यांच्या विचारांना मुक्त वाट करून देऊन त्यांची शब्दरूपीय केलेली गुंफण म्हणजे 'सह्यगिरी' वार्षिक अंक होय.

आमच्या संस्थेचे अध्यक्ष आदरणीय मनोहरजी खापणे साहेब, त्यांचे सर्व सहकारी यांनी आम्हाला सदैव दिलेले बळ,पाठीवर टाकलेली कौतुकाची थाप यामुळेच महाविद्यालयाच्या प्रगतीचा वारू अखंड दौडत आहे. संपादक मंडळाने केलेल्या सहकार्यामुळे या अंकास पूर्ण रूप देणे सुलभ झाले. या अंकाच्या निर्मिती कार्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांचे वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्याबरोबरच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सहलेखक विद्यार्थी यांचेही अनमोल सहकार्य लाभले. 'सह्यगिरी' वार्षिक अंकाचे कमी वेळेत उत्कृष्ट पध्दतीने टंकलेखन व डिझायनिंग करून देणारे यश कॉम्प्युटर पाचलचे श्री. हेमंत पवार यांचेही मनःपूर्वक आभार!

**- सहा. प्राध्यापक सुभाष धोंगडे,** संपादक

## संपादक मंडळ

**◈ अध्यक्ष ◈**

प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम

**◈ मुख्य संपादक ◈**

सहा. प्रा. एस. एस. धोंगडे

**◈ सहसंपादक ◈**

सहा. प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे

सहा. प्रा. एन. जी. देवन

सहा. प्रा. पी. पी. राठोड

सहा. प्रा. एस. जी. चव्हाण

**◈ विद्यार्थी सदस्य ◈**

कु. सायरा काझी

कु. अमेय सावंत

## प्रकटन

फॉर्म नं. ४ (उपविधी क्र. ८)

- **प्रकाशन स्थळ -** श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण, मु. पो. रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४
- **प्रकाशन काल -** वार्षिक
- **मुद्रक** - यश कॉम्प्युटर, पाचल
- **प्रकाशक** - प्र.प्रा.डॉ.पी.एस.मेश्राम
- **राष्ट्रीयत्व** - भारतीय
- **पत्ता -** श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण, मु. पो. रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४
- **संपादक** - सहा.प्रा.एस.एस.धोंगडे
- **राष्ट्रीयत्व -** भारतीय
- **पत्ता -** श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण, मु. पो. रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४
- **प्रकाशकीय हक्का -** प्र.प्राचार्य, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण,मु. पो. रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

**( खासगी वितरणासाठी )**

**टीप -** या अंकातील साहित्याशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

**वर दिलेला तपशिल आमच्या माहितीप्रमाणे खरा आहे.**

सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

## ◈ महाविद्यालयाची वैशिष्ट्ये ◈

- २(एफ) व १२(बी) खाली युजीसीची मान्यता.
- मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्नता.
- नॅक पुनर्मूल्यांकन 'बी' श्रेणी.
- आय.एस.ओ. ९००१:२०१५ प्रमाणित.
- निसर्गाच्या सानिध्यात प्रशस्त इमारत.
- अध्ययन, अध्यापनास सुयोग्य इमारत.
- राष्ट्रिय सेवा योजना, सांस्कृतिक, क्रीडा विषयक विविध उपक्रम.
- प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रांचे आयोजन.
- महिला विकास कक्षातर्फे विद्यार्थ्यींनीसाठी विविध उपक्रम.
- विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासासाठी विशेष उपक्रम.
- विद्यार्थ्यांच्या सर्व गुणांच्या संवर्धनासाठी संवाद वार्तापत्र.
- 'स्पंदन' अर्धवार्षिक अंकाचे प्रकाशन, 'मायबोली', 'दर्पण' भित्तिपत्रिका प्रकाशन.
- शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, इ. मध्ये नेत्रदीपक कामगिरी.
- स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन.
- राज्य व राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये प्राध्यापकांचा सहभाग.
- प्राध्यपकांचे संशोधनपर लेख ISSN / ISBN मध्ये प्रकाशित.
- भव्य क्रीडांगण, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन.
- महाविद्यालया शेजारीच समाजकल्याण विभागाचे शासकीय १०० मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतीगृह.
- विद्यार्थ्यांच्या साहित्यिक कलागुणांच्या संवर्धानासाठी 'सह्यगिरी' वार्षिक अंकाचे प्रकाशन केले जाते.

सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

## ◈ महाविद्यालयातील ग्रंथालयाची वैशिष्ट्ये ◈

- सुसज्ज ग्रंथालय सुविधा.
- सुसज्ज वाचन कक्ष.
- संगणकीकृत ग्रंथालय व संगणक सुविधा.
- वायफाय सुविधा.
- दुर्मिळ संदर्भ ग्रंथांची उपलब्धता.
- वाचन संस्कृती वाढविण्यासाठी गोल्ड कार्ड स्कीम.
- बेस्ट रीडर अवॉर्ड.
- बी.सी.बुक-बँक स्कीम.
- निबंध स्पर्धांचे आयोजन.
- ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. रंगनाथन जयंती कार्यक्रम.
- २४ मासिके, ८७४५ ग्रंथ उपलब्ध.
- आय.सी.एस.एस.आर.बुक कॉर्नर.
- सिध्दीविनायक ट्रस्ट बुक बँक.



सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

## ◈ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद ◈

| | | |
|---|---|---|
| ❖ प्र. प्राचार्य, डॉ. पी. एस. मेश्राम | - | एम्.ए., नेट, पीएच्.डी. (इतिहास) |
| ❖ सहा. प्रा., एस. व्ही. निंबाळकर | - | एम.ए., एम.एड., एम. फिल (हिंदी) |
| ❖ सहा. प्रा., डॉ. व्ही. एस्. पाटील | - | एम.ए., बी.एड., नेट, पीएच्.डी. (मराठी) |
| ❖ सहा. प्रा., डॉ. ए. डी. पाटील | - | एम.ए., पीएच्.डी. (इतिहास) |
| ❖ सहा. प्रा., डॉ. बी. टि. दाभाडे | - | एम.ए., पीएच्.डी. (मराठी) |
| ❖ सहा. प्रा., एस्. एस्. धोंगडे | - | एम.ए. (हिंदी) |
| ❖ सहा. प्रा., एन. जी. देवन | - | एम.ए. (इंग्रजी) |
| ❖ ग्रंथपाल, डॉ. एम. आर. कोंडागुर्ले | - | बी.ए., एम.लिब., नेट, सेट, पीएच.डी. |
| ❖ सहा. प्रा., पी. पी. राठोड | - | एम.ए., सेट (अर्थशास्त्र) |
| ❖ सहा. प्रा., कु. एस. जी. चव्हाण | - | एम्. कॉम., (कॉमर्स) |
| ❖ सहा. प्रा., कु. एम. डी. देवरुखकर | - | एम. कॉम. (अकौन्टन्सी) |

## ◈ महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी वृंद ◈

| | | |
|---|---|---|
| ❖ श्री. राजेश अंबाजी चव्हाण | - | वरीष्ठ लिपीक |
| ❖ श्री. संदिप लक्ष्मण सक्रे | - | कनिष्ठ लिपीक |
| ❖ सौ. स्नेहा विकास कोलते | - | ग्रंथालय परिचर |
| ❖ श्री. संतोष महादेव पालकर | - | शिपाई |
| ❖ श्री. मधुकर भिकाजी साटम | - | शिपाई |
| ❖ श्री. भगवान तुकाराम जाधव | - | शिपाई |
| ❖ श्री. गुलाब हरी मदगे | - | शिपाई |

*सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल*

**संचलित**

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

**पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४**

## ◈ संचालक मंडळ ◈

- ❖ मा. श्री. मनोहर हरी खापणे ........................................................ अध्यक्ष
- ❖ मा. श्री. शंकरराव गंगाराम चव्हाण................................................ उपाध्यक्ष
- ❖ मा. श्री. नरेश बापू पाचलकर........................................................ सरचिटणीस
- ❖ मा. श्री. प्रदिप चंद्रकांत खापणे .................................................... खजिनदार
- ❖ मा. श्री. संजय कृष्णाजी जोशी ..................................................... सहचिटणीस
- ❖ मा. श्री. विजय भास्कर सावंत...................................................... सदस्य
- ❖ मा. श्री. चंद्रकांत आत्माराम लिंगायत............................................. सदस्य
- ❖ मा. श्री. अशोक रघुनाथ सक्रे....................................................... सदस्य
- ❖ मा. श्री. सिध्दार्थ सखाराम जाधव ................................................ सदस्य

## ◈ महाविद्यालयातील विकास समिति ◈

- ❖ मा. मनोहर हरी खापणे...............................................................अध्यक्ष
- ❖ मा. नरेश बापू पाचलकर.............................................................सदस्य
- ❖ मा. प्रदिप चंद्रकांत खापणे .........................................................सदस्य
- ❖ मा. खुशिराम शिवाजी मोरे..........................................................सदस्य
- ❖ मा. मनोज भिकू गांगण ..............................................................सदस्य
- ❖ मा. महादेव बाळकृष्ण रोडे..........................................................सदस्य
- ❖ सहा. प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील ...........................................सदस्य
- ❖ सहा. प्रा. नंदकुमार गोविंद देवन...................................................सदस्य
- ❖ सहा. प्रा. डॉ. विकास शंकर पाटील ..............................................सदस्य
- ❖ सहा. प्रा. संजय वसंत निंबाळकर ................................................सदस्य
- ❖ सहा. प्रा. सुभाष सिताराम धोंगडे ..................................................सदस्य
- ❖ श्री. राजेश अंबाजी चव्हाण...........................................................सदस्य
- ❖ कु. साहिल सत्यवान नार्वेकर .......................................................सदस्य
- ❖ डॉ. प्रमोद शिवचरण मेश्राम .........................................................प्र. प्राचार्य व सचिव

सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

## --- व्हिजन ---

विद्यार्थी वर्गाला आणि समाजाला शिक्षणाच्या क्षेत्रात आणि त्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात उच्च दर्जाची सेवा देण्याची जबाबदारी व विशेषाधिकार आहे, हाच महाविद्यालयाचा दृष्टिकोन आहे.

## --- मिशन --

दुर्गम व मागास भागातील तरूणांच्या सुप्त गुणांचा व बुध्दिमत्तेचा विकास करून त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी उच्च शिक्षणाद्वारे कोकणचा पर्यायाने राष्ट्राचा विकास करण्यासाठी चालना देणे.

# ◈ मराठी विभाग ◈

## अं त रं ग


| अ.क्र. | लेख / कवितेचे नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | लेक वाचवा | कु. अक्षय सावंत | ७ |
| २ | शेतकऱ्यांच्या समस्या | कु. यश धावडे | ९ |
| ३ | वाचन ते वाचन संस्कृती | कु. यश प्रफुल्ल धावडे | १२ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य | कु. कलिका जाधव | १४ |
| ५ | भारतीय संविधानाची ओळख | कु. राहूल हरिश्चंद्र पाटेकर | १६ |
| ६ | भारतीय संविधानाची ओळख | कु. भरत प्रकाश जोशी | १८ |
| ७ | राजे | कु. ज्योती गंगाराम कांबळे | २१ |
| ८ | तर हे जगणे रंगीत आहे... | कु. सायराबानू अस्लम काझी | २४ |
| ९ | पाऊस | कु. सायराबानू अस्लम काझी | २५ |
| १० | गरिब | कु. सायराबानू अस्लम काझी | २५ |
| ११ | थंडी | कु. सायराबानू अस्लम काझी | २६ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | कु. सायराबानू अस्लम काझी | २७ |
| १३ | पुस्तकांची व्यथा | कु. सायराबानू अस्लम काझी | २८ |
| १४ | पाऊस | कु. अर्सिन अ.र. गडकरी | २९ |
| १५ | जीवनात आणखी काय हवं...? | कु. प्राची पडवळ | ३० |
| १६ | भारत | कु. पुनम ठोंबरे | ३१ |
| १७ | आठवण कॉलेजची | कु. यश प्रफुल्ल धावडे | ३२ |
| १८ | थंडी थंडी | कु. निसर्गा धावडे | ३२ |
| १९ | आला ऋतू थंडीचा | कु. सुजानी पांचाळ | ३३ |
| २० | थंडी | कु. प्राची पडवळ | ३३ |
| २१ | पहाटे धावताना भेटलेली थंडी | कु. प्राची पडवळ | ३४ |
| २२ | निःशब्द संध्या सायंकाळी | श्री. संदिप सक्रे, पाचल | ३५ |
| २३ | पुर्नभेट | श्री. संदिप सक्रे, पाचल | ३६ |

# ◈ लेक वाचवा ◈

**- कु. अक्षय सावंत**
टी.वाय.बी.ए.(मराठी)

*“नव्या समाजाची स्त्री*
*अबला नका समजू तिला*
*अन्यायाच्या विरुध्द व्देषा*
*न्यायाच्या विरुद्ध जोषा*
*हीच आहे तिची रीत*
*हाच आहे तिचा न्याय.”*

यावरून आपल्याला समजते की, आजची स्त्री आणि पूर्वीची स्त्री यांच्यातील फरक काय तो? पूर्वीच्या स्त्रिया शिक्षणापासून अलिप्त राहिलेल्या होत्या पण आजच्या स्त्रिया शिक्षणाने समृध्द आहेत. म्हणून सांगते की, जर आपल्याला समाजातील समस्यांना तोंड दयावयाचे असेल तर शिक्षण हे सर्वांच्या जीवनात घडलेच पाहिजे. आजची स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे 'चूल आणि मूल' या दोन्ही गोष्टींची स्त्री आता राहिली नाही. आजच्या राष्ट्रपती हया एक स्त्रीच आहेत. आर. आर. आबांनी शिक्षण एका स्त्रीकडेच घेतले. आम्हीही आज एका स्त्रीकडेच शिक्षण घेत आहोत. आपल्या देशावर कोण हल्ला करत असेल तर आपण हिंदू- मुस्लिम एक होऊन त्यांना रोखतो. तेव्हा मात्र आपण हिंदू - मुस्लिम बघत नाही, भेदभाव करत नाही. मग स्त्री-पुरुष यात भेदभाव का करतो?

*"औरत तेरी यही कहानी*
*आँचल में दूध और आँखों में पानी।”*

या उक्तीप्रमाणे आपल्या भारत देशामध्ये पूर्वीच्या स्त्रियांचा हा परिचय, हेच तिचे अस्तित्व. चूल आणि मूल एवढीच तिची मर्यादा होती. बाल्यावस्थेत पित्याच्या अधिन असलेली उपेक्षित स्त्री अज्ञान, अंधविश्वास यामध्ये गुरफटलेली होती. 'स्त्री हे परक्याचे धन असते' असे म्हटले जाते. पण स्त्री तिच्या वर होणारे-अत्याचार, मानसिक, लैंगिक छळ आणि समजातून मिळणारी तुच्छता हे सर्व पाहताच अजून स्त्री कोषातच असलेली आढळून येते. तिला या सर्वातून बाहेर पडायचे असेल तर आधी तिने स्वतःला ओळखले पाहिजे. जिजामातांनी शिवरायांना घडवलं म्हणून स्वराज्य निर्माण झालं. सावित्रीबाईनी मुलींच्या शिक्षणासाठी फार अथक प्रयत्न केले. कस्तुरबा गांधीनी आजारी असताना दांडी यात्रा केली हे सर्व स्त्रीमुळेच घडते.

*‘उमलु द्या कोमल कळी*
*नका देऊ तीचा गर्भात बळी’*

आजच्या युगात फक्त पुरुषच पुढे जातात असं नाही. तर स्त्रीसुद्धा अनेक क्षेत्रात पुढे जाऊ शकते. नेमबाज पट्टू म्हणून आज तेजस्विनी सावंतला ओळखले जाते. आकाशात जाऊन आपल्या प्राणाची आहुती देणारी कल्पना

चावला. तिचा वारसा चालवणारी सुनिता विल्यम अशा किती महिलांची नावे घ्यावी तेवढी थोडीच. मुलगी जन्माला आल्यावर तिला मारून टाकलं जातं, पण जर मुलगा जन्माला आला तर मात्र नाचत गावाला मटणाचं जेवण घालतात. मुलगी जन्माला - आल्यावर तिला मारलं तर कोणत्या ना कोणत्या रूपात ती आपल्याला त्रास देते. मुलगीच्या लग्नावेळी मुलाकडचे हुंडा मागायला विसरत नाहीत. लग्नाची बोलणी करताना मुलाकडचे सर्वात पहिला हुंडा किती देणार विचारतात. मुलाकडचे हुंडा मागतात म्हणून कोण मुलीला जन्म देत नाहीत. मुलीला जन्म दिला नाही तर पुढची पिढी कशी निर्माण होणार? आणि म्हणूनच हा बदल घडविण्यासाठी स्त्रीनेच पुढाकार घेतला पाहिजे.

मुलगी ही पहिली बेटी व तुपाची रोटी असते. एस. पी. विश्वास नांगरे पाटील यांनी आपल्या व्याख्यानात सांगितलं एक महिला होती, तिला लागोपाठ तीन मुली होत्या. मुलगा होत नाही म्हणून तिच्या नवऱ्याने तिच्या तोंडात वरवंटा घातला. तिचे सात दात पडले व काही दात तिला टोचले. तिचे तोंड रक्ताने भरले होते, पण कुंकू वाचावं म्हणून तिने पोलिसांना काही सांगितलं नाही. प्रत्येक पुरुषाच्या मागे स्त्रीचा हात असतो. यावरूनच आपल्याला कळते की, स्त्रीकडे फक्त पैशाचा साठा नसून माणूसकीचा, कर्तृत्वाचा, अभिमानाचा साठा आहे.

*"दुःखाचे ओझे आहे स्त्री*
*हृदयाचे अमृत आहे स्त्री*
*प्रेम, जिव्हाळा आहे स्त्रीकडे*
*ज्ञानार्जन करून नवरा बनवला स्त्रीने*
*दोन जीवांची साथ घडवून संसार दिला स्त्रीने*
*दोन नाही, गुरू नाही सर्वांहून पूज्य स्त्री"*

प्रत्येक पुरुषाच्या मागे स्त्रीचा हात असतो. पुरुष सायकल असेल तर त्याची चाके मात्र स्त्रीच असते असे मला वाटते. सुरुवातीला स्त्रीला शिक्षणाची सोय नव्हती. आपल्या संसाराचा त्याग करून इतरांच्या कल्याणासाठी चंदनासारखी झिजणारी स्त्री १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील मुलींच्या शाळेतील पहिली शिक्षिका म्हणजे सावित्रीबाई फुले ह्या होत्या. ज्या स्त्रीवर फुलांचा वर्षाव झाला पाहिजे होता त्या स्त्रीवर दगड, गोटे, शेण यांचा वर्षाव होत होता. पण या स्त्रीने न डगमगता मुलींसाठी शिक्षणाची सोय केली.

*"जळणाऱ्या तर अनेक असतात,*
*नंदादीपासारखी जळणारी एखादीच असते!*
*स्त्रिया तर सगळ्याच असतात*
*कर्तृत्वाने अमर एखादीच असते!"*

भारतातील नोबेल पुरस्कारासाठी मदर तेरेसा प्राप्त झाल्या होत्या. त्या नोबेल पुरस्कार स्वीकारायला तयार नव्हत्या, पण गरिब बांधवांसाठी त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मला ही असं काहीतरी करून दाखवायचंय. मला भारती जेजुरीया या स्त्रीसारखं बनायचंय. भारती जेजुरीयानं पोहण्याच्या नऊ डावामध्ये नऊ सुवर्ण पदक पटकावली आहेत. मला फार आनंद होत आहे की, मला हा लेख लिहायला सांगितला आहे. डॉक्टर, अधिकारी, कर्मचारी व सर्व स्टाफ हे लेक वाचवण्यासाठी अहोरात्र झटत आहेत. मी आपणा सर्वांना विनंती करते की, आपण सर्वांनी त्यांना सहकार्य करावं.

# ◈ शेतकऱ्यांच्या समस्या ◈

- **कु. यश धावडे**
टि.वाय.बी.ए.(मराठी)

*"शेतामंधी माझी खोप*
*तिला बोराटीची झाप*
*तिथ राबतो कष्टतो*
*माझा शेतकरी बाप*

*माझा बाप शेतकरी*
*उभ्या जगाचा पोशिंदा*
*त्याच्या भाळी लिहलेला*
*रातदिंस कामधंदा"*

वरील काव्यपंक्तीमधून कवी इंद्रजित भालेराव यांनी शेतकयांची व्यथा मांडली आहे. ही व्यथा पूर्वीही होती आजही आहे आणि पुढे कधीपर्यंत असेल ते सांगता येत नाही. कारण मी असं दररोज ऐकत आलो आहे की रामू नावाच्या शेतकऱ्याने सावकारांकडून द.सा.द.शे व्याज दराने कर्ज घेतलं आहे. पण मी असं कधीच ऐकल नाही की सावकाराने द.सा.द.शे. दराने रामू नावाच्या शेतकऱ्याकडून कर्ज घेतले. कारण या कृषीप्रधान समजलेल्या भारत देशामध्ये शेतकऱ्यांची परिस्थिती फक्त कर्ज काढून पोट भरणे अशीच आहे. कारण आपल्या भारत देश कृषीप्रधान समजला जात असेल तर शेतकऱ्याला कर्ज काढण्याची वेळच का येते याचे उत्तर कोणीही देवू शकत नाही ही मोठी खेदाची बाब आहे.

आपल्या कृषीप्रधान भारत देशामध्ये या भूमीपुत्राची प्रत्येक ठिकाणी गळचेपी होताना दिसते. 'जगाचा पोशिंदा' समजला जाणारा हा भूमीपूत्र कधी सावकाराच्या तर कधी बँकेच्या शोषणाचा बळी ठरत आहे. आपल्या पोटाची पर्वा न करता जगाचे पोट कसे भरेल याची चिंता त्याच्या मनामध्ये असते.

आमचे बापजादे शेतावर राब-राब राबतात. रक्ताचं पाणी करून शेती फुलवतात. घामाच्या प्रत्येक थेंबागणिक पीकं फुलवतात, शेतामध्ये पेरणी केल्यापासून ते पीक बाजारात विक्रीसाठी नेईपर्यंत त्याची प्रत्येक स्तरावर त्यांच शोषण होत आहे.

पाणीवाले शेताला पाणी वेळेवर देत नाहीत. जवळ पैसा नसल्यामुळे लागवड वेळेवर देता येता नाही. भेटलीच तर ती योग्य भावाने भेटत नाही. या समस्येतून हा भूमिपूत्र केव्हा मुक्त होणार? केव्हा तो सुखी होणार? याचे उत्तर कोणीही देवू शकत नाही.

भूमिपुत्राला जगाचा पोशिंदा समजले जाते ते फक्त वाचण्यात आणि लिहण्यात. वास्तवात त्याच्या समस्या काय आहेत? तो सुखी आहे का? याकडे तुमचे आमचे आणि शासन प्रणालीचे लक्ष थोडेच आहे. शासकीय नोकरीवरती असणाऱ्या व्यक्तीला शासन चांगल्या सुखसोई देते. निवृत्ती वेतन देते. फंड, विमा, दवाखाना, मोफत बस प्रवास अशा क्षेत्रात सवलती देते. याच सवलती मात्र सामान्य शेतकत्यांना का मिळत नाहीत? जगाचा पोशिंदा समजल्या जाणाया या शेतकऱ्याला अशा सोईपासून वंचीत का ठेवले जाते? याचे उत्तर शासन प्रणाली देण्यास सक्षम आहे असे दिसत नाही.

शेतामधे बी पेरणी केल्यापासून पीक शेतामध्ये डोलायला लागेपर्यंत खूप कष्ट करावं लागतात आणि त्यात पाऊस वेळेवर पडला नाही तर सर्व पीक वाळून जातं. हाता-तोंडाशी आलेला घास एखादयाने हिरावूनच घेतला असे वाटतं. केलेल्या कष्टाचं मातीमोल झालं अस वाटतं, परंतु दोष निसर्गाचा असला तरी या भूमिपुताला डोक्याला हात लावून बसल्याशिवाय पर्याय नसतो. पीक दुष्काळात वाळलं तरी बँक काही सवलत देत नाही. सावकाराची बोचण सुरूच राहते. घरात खायला तर काहीच नसते मग हा शेतकरी सावकाराचं व बँकेचं कर्ज परत कसं करणार? कोण त्याची समस्या सोडवणारं? कोण त्याला धीर आधार देणार? त्यावेळी तर कोणीच नसतं. घोर निराशा होते. कुणी मदत करेल अस वाटत नाही, दोन वेळच पोटालाही मिळत नाही आणि जणु काय आपलं सगळं संपलच असं वाटायला लागतं आणि यातून घडून येते ती म्हणजे 'शेतकऱ्याची आत्महत्या...'आणि हीच बातमी वर्तमान पत्राच्या पहिल्या पानावर छापून येते. वाचणारे वाचतात आणि सोडून ही देतात. अरे आपला भारत देश कृषीप्रधान आहे ना! मग शेतकऱ्यांवर अशी वेळ का येते?

अरे आपला भारत देश एकविसाव्या शतकामध्ये आहे. विकासाच्या मार्गावर आहे पण शेतकऱ्यांची परिस्थिती पाहिली तर भारत देश अधोगतीच्या मार्गावर असलेला दिसून येते. डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आपला भारत देश २०२० पर्यंत महासत्ता बनेल असं भाकीत केलं होतं. पण दररोजच्या वर्तमानपत्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहून हे भाकीत पुर्णत्वाला जाईल असे वाटल नाही.

चार भिंतीच्या आत खुर्चीवर लिहिणाऱ्या साध्या कारकुनाला तीस हजार पगार दिला जातोय आणि जन्मभर आपला देह झिजवणाऱ्या भूमीपत्राच्या नशीबी कायम गरीबी, कष्ट आणि निराषेतून आत्महत्या... हाच काय तो कृषीप्रधान भारत देश? अरे अमेरिका, जपान हे देश का प्रगतीपथावर आहेत तर त्या देशात कष्टकरी व्यक्तीला जादा पगार, जादा सवलती दिल्या जातात म्हणूनच अमेरिका महासत्ता बनली आणि जपानने जगाला लाजवेल अशी राखेतून उडून प्रगती केली.

दुष्काळ पडला की, मंत्री दुष्काळग्रस्त भागाला भेट देतो, पहाणी करतो आठवडा भरात पेपरला बातमी येते की, शासनाने दुष्काळग्रस्तांसाठी ऐवढ्या ऐवढ्या कोटिचा निधी मंजूर केला. वाचून बरं वाटतं. शेतकऱ्याला

दिलासा मिळेल असं वाटतं पण प्रत्यक्षात पाहीलं तर तो निधी शेतकऱ्यांच्या हातात येतच नाही, तर तो एवढा कमी असतो की, त्यामध्ये शेतकऱ्यांच्या उध्वस्थ झालेल्या शेतीचं नुकसान भरून निघत नाही. वस्तूचे भाव तर गगनाला भिडलेले असतात. खुर्चीवर बसून पगार घेणारे दुष्काळाला भीक घालत नाहीत आणि यामध्ये भरडला जातो तो शेतकरी. मग 'मित्रहो" आपला भारत देशाला महासत्ता व्हायचं असेल तर त्यासाठी भूमिपुत्राचीही स्थिती योग्य आहे का याकडे लक्ष दिले पाहिजे. साधी सरळ आणि सोपी गोष्ट आहे जगाचा पोशिंदा समजला जाणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था गरीबीने पोखरलेली व कर्ज काढून पोट भरण्याची वेळ असेल तर कशी प्रगती होईल. त्यासाठी भूमिपुत्राच्या समस्या गांभीर्याने घेवून त्या तुम्ही-आम्ही आणि शासनाकडून निवारण्यात याव्यात आणि त्या सोडवल्या तर आपला भारत देश नक्कीच महासत्ता बनेल यात शंका नाही.

धन्यवाद!



# ◈ वाचन ते वाचन संस्कृती ◈

- कु. यश धावडे
टि.वाय.बी.ए.(मराठी)

मोबाईल आणि समाज माध्यमांमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तकाकडे वळवण्यासाठी एक-दोन दिवसाच नव्हे तर संपूर्ण पंधरवडयाचे नियोजन करण्यात आले आहे. ज्यांनी अजून अभ्यासक्रम बाह्य वाचनाच्या क्षेत्रात पहिले पाऊलही टाकलेले नाही, त्यांना पुस्तक वाचण्याचा आनंद काय असतो? पुस्तक वाचन म्हणजे नेमके काय? हे कळण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. या उपक्रमाचे अंतिम उदिदष्ट हे वाचन संस्कृती निर्माण व्हावी, वाढावी हा आहे. यामध्ये विशेष म्हणजे राज्यातील सर्व शासकीय ग्रंथालयांचाही असणार आहे. या उपक्रमामध्ये अनेक विद्यार्थी प्रथमच अवांतर वाचन कौशल्याकडे जाणार आहेत. काही विद्यार्थ्यांकडे हे कौशल्य पूर्वीपासूनच असणार आहे. बरेचसे विद्यार्थी केवळ ऑनलाइन येणारे बरेचसे अवास्तव साहित्य वाचणारे असणार आहेत. या सर्वांना एकत्र आणण्याचे काही जणांसाठी अनिच्छेने असले, तरीही या उपक्रमात सहभागी होण्याचे कार्य या उपक्रमातून साध्य होणार आहे. वाचनाचे महत्त्व सांगणारी व्याख्याने काही विद्यार्थ्यांवर निश्चितच वाचन संस्कार करणार आहेत. म्हणूनच मोबाईल युगात हा अभिनव उपक्रम महत्वाचा ठरतो. मनापासून वाचणारी मंडळी निश्चितच वाचन संस्कृती पर्यंत पोहोचणार यात शंका नाही. वेळ किती लागणार हे त्या वाचकाच्या वाचन गतीवर आणि शास्त्रशुध्दतेवर अवलंबून असणार आहे. वाचन मूलत: मानवाला ज्ञान संपन्न बनवते. ज्ञानसंपन्न व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आपोआपच चारचौघांत उठून दिसते. नव्याने वाचन प्रवासात येणाऱ्या वाचकांनी हे 'लक्षात घेण्याची गरज आहे की, वाचन मे व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, वाचन संस्कृती या प्रवासातील वाचन हा पहिला टप्पा आहे.

या प्रवासात येऊ इच्छिणाऱ्यांचा काय वाचावे असा प्रश्न असतो. वाचणार कधी? आपल्याकडे वाचनासाठी बिलकूल वेळ नाही, असे अनेकांचे मत असते. वेळ नाही ही तक्रार अत्यंत चुकीची आहे. सर्वांकडे केवळ दिवसाचे चौवीस तासच असतात. या चोवीस तासात आपण काय करतो, याचा हिशोब आपणच मांडायला हवा. दिवसभर आपण किती वेळ वाया घालवतो हे आपोआपच लक्षात येते. त्याचप्रमाणे आपली कोणाशी तरी बैठक ठरलेली असते. आपण वेळेवर जातो मात्र समोरची व्यक्ती वेळेवर येत नाही. हा प्रतीक्षा कालावधी तर खूप त्रास देणारा असतो. मात्र अशावेळी जर आपल्या बरोबर एखादे पुस्तक असेल तर आपला वेळ निश्चितच चांगला जातो. आपली चिड-चिड होत नाही. त्यामुळे वेळ नाही ही सबब योग्य नाही. मात्र वाचनाची सुरुवात करताना आपल्या

आवडीच्या विषयाच्या हलक्या पुस्तकांनी करावी. पुढे आपले वाचन जसे समृध्द होत जाते तसे आपले हात इतर विषयांकडे या विषयातील आभिजात पुस्तकांकडे आपोआप जायला सुरुवात होते.

वाचन करायचे तर पुस्तक वाचायचे, मात्र कोणते पुस्तक वाचावे? असा प्रश्न अनेक वाचक विचारतात. काय वाचावे? असाही काहींचा प्रश्न असतो. खरे सांगायचे तर जे मिळेल ते वाचावे. त्यातून आपण वाचनासाठी पुस्तक निवडताना पुस्तकांची प्रस्तावना आणि पाठराखण वाचून ठरवता येते. पुस्तकाचे वाचन करताना आपण त्या भूमिकेत शिरुन पुस्तक वाचायला हवे. पुस्तकाचे वाचन मन एकाग्र करून वाचन करण्याची गरज असते. आपण वाचन केलेले पुस्तकातील विचार आपल्या मेंदूपर्यंत पोहोचले पाहीजेत. पुस्तकातील चांगले विचार अनुभव हे आपण निवडायला हवेत. मेंदू हा आपल्यासाठी वरदान आहे. याचा वापर करूनच आपण इतर प्राण्यांपेक्षा वेगळे ठवलो आहोत. आपल्याला संगणकाची, मोबाईलची मेमरी किती आहे? हे माहीत असते. मात्र आपल्याच मेंदूची मेमरी किती आहे? हे अनेकांना माहीत नसते. मानवी मेंदू साधारण १३०० से १४०० ग्रॅम वजनाचा असतो. त्याची स्मृती क्षमता किंवा साठवण क्षमता २५ लक्ष गिगाबाईट (जी.बी.) इतकी आहे. आजमितीला कोणाकडेही एवढी मेमरी असणारा संगणक किंवा मोबाईल असणे शक्य नाही असे असतानाही आपण त्याचा वापर अत्यल्प करतो. आपण जर याचा वापर कमी करत गेलो, तर डार्विनच्या सिध्दांतानुसार भविष्यात मानवी मेंदू आकाराने घटत जाईल. त्यामुळे त्याचा वापर आपण जास्तीत केला पाहीजे. विशेष म्हणजे आपल्या शरीराने तयार केलेल्या ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर हा मेंदूच करतो. त्यामुळे आपण वाचलेल्या पुस्तकातील चांगले विचार, अनुभव आपण येथे पाठवायला हवेत असे आपण लाखो पुस्तकातील चांगले विचार, अनुभव आपल्या मेंदूमध्ये साठवू शकतो. आपल्या मेंदूचा केवळ सहा ते सात टक्के भाग वापरला जातो असे वैद्यक शास्त्र सांगते. त्यामुळे वाचताना वेचलेले या मेंदूमध्ये साठवायला हवे. वाचताना वेचलेले आणि मेंदूमध्ये साठवलेले मोकळ्या वेळेत आठवायला हवे. जे काही साठवलेले आठवते, त्यावेर आपल्या मेंदूमध्ये विचार करायला हवा, हा विचार सर्व बाजूंनी करायला हवा. यातून आपण ज्या व्यक्तीबाबत घटनेबाबत वाचलेले, साठवलेले आठवत असतो. त्या व्यक्तीला घटनेला समजून घेण्यासाठी खूप उपयुक्त आणि गरेजेचे असते.



# ◈ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य ◈

**कु. कलिका उदयचंद जाधव**
एस.वाय.बी.ए.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला. ते त्यांच्या पालकांचे १४ वे आणि शेवटचे अपत्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुभेदार रामजी मालोजी सकपाळ यांचे सुपुत्र होते. बाबासाहेबांचे वडील ब्रिटीश सैन्यात सुभेदार होते. ते संत कबीरांचे अनुयायी होते आणि सुशिक्षित होते.

डॉ. आंबेडकर त्यांची शालेय शिक्षण सातारा येथे घेत होते. तेव्हाच दुर्दवाने डॉ. आंबेडकरांनी त्यांची आई गमावली आणि त्यांच्या आत्याने त्यांचे संगोपन केले. त्यानंतर ते मुंबईला राहायला आले. शालेय शिक्षणा दरम्यान त्यांना अस्पृश्यतेचा अभिशाप सहन करावा लागला. १९०७ मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर त्यांचा विवाह, बाजारातील एका खुल्या शेडमध्ये झाला.

१९१६ मध्ये त्यांनी भारतातील जाती - त्यांची व्यवस्था उत्पत्ती आणि विकास हा शोध निबंध वाचला. १९१६ मध्ये त्यांनी भारताचा राष्ट्रीय लाभांश - एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास हा प्रबंध लिहिला आणि पीएच.डी. पदवी मिळवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक भेदभावा-विरुध्द लढा दिला आणि समाजातील अनेक गटांच्या हक्कांसाठी काम केले. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली. महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांच समर्थन केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य :-**

अस्पृश्यांविरूध्द होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक हक्कांचा पुरस्कार केला. कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. भारतीय संविधानाच्या मसुद्यात समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची तत्त्व समाविष्ट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

विविध तरतुदींद्वारे, विशेषत: मुलभूत हक्कांअंतर्गत जाती-आधारित भेदभाव बेकायदेशीर ठरवण्यात आला. अनुसूचित जाती आणि जमातीसाठी शाळा आणि विदयापीठे स्थापन करण्यासाठी प्रयत्न केला. इतिहासकालीन स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास करून त्यांना जाचक रूढी आणि परंपरा पासुन सुटका मिळावी यासाठी प्रयत्न केले. त्यांनी दलित बौध्द चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले.

ते ब्रिटीश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौध्द धर्माचे पुनरुज्जीवक होते. आंबेडकरांनी महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक हक्कांच्या पुरस्कार केला आणि नागरी सेवा रोजगार, अनुसूचित जाती आणि जमातींसाठी शाळा विद्यापीठे आणि इतर मागासवर्गीय, सकारात्मक कृतीसारखीच एक प्रणाली यासाठी विधानसभेचा पाठिंबा मिळवला.

१४ एप्रिल या सोनेरी दिवसाच सामाजाच्या आणि देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व अहि. देशातील कोटयावधी दीनदुबळ्यांसाठी तसेच देशासाठी हा दिवस कार आनंददायी आहे. या दिवशी दिवसभर मोठया उत्साहान खेडयापाडयांपासून ते दिल्लीपर्यंत डॉ. बाबासाहेबांची जयंती साजरी केली जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षणासाठी म्हणजेच एम.ए. पदवीसाठी २५ जुलै १९१३ रोजी अमेरीकेतील कोलंबीया विद्यापिठात प्रवेश केला. प्रो. सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली जुन १९१५ मध्ये एम. ए. ची पदवी संपादन केली. ऑक्टोबर १९१६ मध्ये इंग्लंडमध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिअल सायन्स येथे एम.एस.सी इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश केला. प्री. कॅनन आणि सेडनी वेब यांच्या मार्गदर्शनाखाली १९२० मध्ये पदवी संपादन केली.

बाबासहिबांनी जगातील सामाजिक शास्त्रांचा (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र धर्मशास्त्र नीतीशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहासशास्त्र आणि कायदा शास्त्र) सखोल अभ्यास केला. त्याचबरोबर जगातील साम्राज्यशाही, भांडवलशाही, जगातील शुध्द स्वाच्या लढाया आणि विविध क्रांत्यांचा अभ्यास केला. तसेच वंशवादाचा आणि जागतिक स्तरावर असलेल्या गुलामांच्या जीवनांवर अभ्यास केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातील सर्वसामान्य माणुस सर्वशक्तीनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान स्वाभिमान, अस्मिता व सामर्थ्याची जाणिव करून दिली, मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याचे शिकवले. त्यासाठी संघर्ष चे सत्याग्रह करून समता व न्याय समाजात निर्माण केले.

**जगातील आदर्श समाज निर्माण :-**

जगातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी लोकशाही शासनाचा स्वीकार केला. त्यासाठी एक व्यक्ति, एकमत, एक मुल्य आणि त्यांची एकच किंमत हा सिद्धांत दिला. ही राजकीय लोकशाही असली तरीही त्याचे रूपांतर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीमध्ये व्हावे, असे त्यांना वाटत होते. तरच जगापुढे हा देश टिकेल अन्यथा अडचणीत येईल. यासाठी त्यांनी जगाला शोभेल आणि भारताला आधुनिक काळात सर्व प्रकारच्या सुधारणा व सर्वांगिण विकास करता येईल अशी राष्ट्राला राज्यघटना दिली.

२२ व्या शतकात देशाला विकासाच्या दिशेला जायचे असेल, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारां शिवाय पर्याय नाही, असे मला वाटते.

# ◈ भारतीय संविधानाची ओळख ◈

**- कु. राहूल हरिश्चंद्र पाटेकर**
टि.वाय.बी.कॉम.

*"देशाला आकार, स्वातंत्र्याला आधार*
*साऱ्या जगात महान, भारतीय संविधान"*

संविधान हे मूलत: राजकीय समुदयाच्या मूलभूत तत्त्वांचा आणि कायदयांचा समुह आहे. जो एकतर राष्ट्र किंवा राज्य असते, जो त्यांच्या सरकाचे अधिकार आणि कर्तव्ये आणि त्याच्या नागरिकांना हमी दिलेले अधिकार ठरवतो. ते सरकारी संस्थांची रचना आणि कार्यप्रणाली आणि व्यवस्थेची राजकीय तत्त्वे ठरवते. राज्य आणि शासन व्यवस्था स्थापन करणारा सर्वोच्च कायदा, संविधान असण्याची कल्पना प्राचीन काळापासून सुरु आहे. भारतीय संविधान हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हा दस्तऐवज मुलभूत राजकीय संहिता, संरचना, कार्यपध्दती, अधिकार आणि सरकारी संस्थांची कर्तव्ये आणि मूलभूत अधिकार मार्गदर्शक तत्वे आणि नागरिकांची कर्तव्ये निर्धारित करणारी चौकट मांडलो.

भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत. हे २१ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताच्या संविधान सभेत स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. राज्यघटनेने भारत सरकार कायदा १९३५ ची जागा देशाचा मुलभूत प्रशासकीय दस्ताऐवज म्हणून घेतली आणि भारताचे अधिराज्य हे भारताचे प्रजासत्ताक बनले.

आंबेडकरांच्या शब्दात संविधानाचा परिचय सांगायचा झाला तर, "संविधान" हे केवळ वकिलाचे दस्ताऐवज नाही; ते जीवनाचे वाहन आहे आणि त्याचा आत्मा नेहमीच युगाचा आत्मा असतो. आधुनिक जगात संविधानाची उपस्थिती अत्यंत प्रासंगिक बनली आहे. संविधानाशिवाय चालणारा देश, विशेषत: लोकशाही असलेला देश शोधणे अत्यंत दुर्मिळ आहे. प्रत्येक देशात, नागरिकांच्या हितांना नेहमीच त्यांचे योग्य महत्त्व दिले पाहिजे आणि सत्तेत असलेल्यांना मनमानी कृतीपासून त्यांचे संरक्षण केले पाहिजे. सरकारी संस्थांची रचना आणि कार्यप्रणाली आणि व्यवस्थेची राजकीय तत्त्वे ठरवते. राज्याच्या किंवा राष्ट्राच्या संविधानात असे कायदे किंवा नियम असतात जे त्यांच्या सरकारचे स्वरूप आणि नागरिकांप्रती त्यांचे

संबंधित अधिकार आणि कर्तव्ये आणि नागरिकांचे सरकारप्रती असलेले अधिकार आणि कर्तव्ये ठरवतात. साधारणपणे, इतर कार्य कायदे संविधानाच्या अधीन असतात म्हणजेच, इतर सर्व कायदे वैध होण्यासाठी संविधानाशी सुसंगत असले पाहिजेत.

एखाद्याचे हक्क आणि स्वातंत्र्यांचे संरक्षण ही संविधान बजावत असलेल्या सर्वात महत्त्वाच्या भूमिकांपैकी एक आहे. ते भाषण आणि धर्म स्वातंत्र्य, संघटना आणि समान संरक्षण यासारख्या मूलभूत नागरी स्वातंत्र्याचे संरक्षण करते ते राज्याच्या अतिरेकांविरुद्ध अडथळा म्हणून देखील काम करतात आणि व्यक्ती आणि गटांना अन्याय वागणूक रोखतात. अशा प्रकारे, जेव्हा हे अधिकार संविधानात समाविष्ट केले जातात, तेव्हा त्यांचे सहजपणे उल्लंघन केले जाऊ शकत नाही कारण ते संविधानाने संरक्षित आहेत.

*"न्याय, स्वातंत्र्य, समता,*
*बंधुता, दिली ही महान तत्त्वे संविधानाने,*
*महान तत्त्वे संविधानाने,*
*जात, धर्म, प्रांत, भाषा,*
*विसरून जगूया आपण*
*फक्त माणुसकीने...!"*



# ◈ भारतीय संविधानाची ओळख ◈

**- कु. भरत प्रकाश जोशी**
एस.वाय.बी.कॉम.

भारतीय संविधान हे आपल्या देशाच्या शासन व्यवस्थेचे मूलभूत तत्वज्ञान आणि मार्गदर्शक तत्त्व आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान तयार झाले, तर २६ जानेवारी १९५० रोजी ते अंमलात आले. या दिवशी भारत प्रजासत्ताक म्हणून ओळखला जाऊ लागला. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान विशेष महत्त्वाचे आहे. संविधानाच्या निर्मिती प्रक्रियेत २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस लागले. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. ज्यामध्ये २२ भाग, ३९५ कलमे आणि १२ अनुसूची समाविष्ट आहेत. भारतीय संविधानाला लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, आणि सार्वभौमत्व या तत्वांचा पाया आहे. त्यामध्ये सर्व नागरिकांना समान हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्माची निवड, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या मूलभूत अधिकारांची हमी दिली आहे.

संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास साधण्यासाठी आहेत. भारतीय संविधानाची एक विशेषता म्हणजे त्याची लवचिकता. वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा संविधानाला अधिक सुसंगत आणि आधुनिक बनवतात. यामुळेच संविधान आजही देशाच्या गरजांना अनुरूप राहिले आहे. भारतीय संविधान केवळ कायद्यांचा दस्तऐवज नसून, ते आपल्या देशाच्या विविधतेत एकतेचा प्रतिक आहे. यामुळेच प्रत्येक भारतीयाने संविधानाचा आदर करणे, त्यातील मूल्यांचे पालन आणि देशाच्या विकासासाठी योगदान देणे हे आपले कर्तव्य आहे. "भारतीय संविधान हे भारताचे आत्मस्वरूप आहे, असे मानले जाते. कारण तेच आपल्या देशाला योग्य दिशा आणि प्रगतीचा मार्ग दाखवते. भारताचे संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे हे संविधान भारतातील नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये सुनिश्चित करते. ते लोकशाहीच्या तीन स्तंभांच्या कार्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करते. जसे, विधीमंडळ, न्यायपालिका आणि कार्यपालिका.

भारतात दरवर्षी २६ नोव्हेंबरला 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचा मुख्य उद्देश संविधानाबद्दल जागृती करणे हा आहे. आपण एकजुटीने आपले हक्क, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडूया. देशाच्या राज्यकारभारासंबंधीच्या तरतुदी एकत्रितपणे व सुसूत्रपणे ज्या ग्रंथात नमूद केलेल्या

असतात त्याला संविधान असे म्हणतात. संविधान बनवण्यासाठी पहिली सभा ९ डिसेंबर १९४६ ला झाली होती. डॉ. राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. भारतीय संविधान हे केवळ कायदयाचे पुस्तकं नाही, तर देशाच्या भविष्याचा एक दृष्टीकोन आहे. त्यामुळे भारतीय संविधानाचे महत्त्व अतुलनीय आहे. कारण ते देशाच्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनाचा आधार आहे. भारताचे संविधान म्हणजे या देशाच्या जनतेने ब्रिटिश वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी दिलेल्या स्वातंत्र्य लढ्याचे फलित होय. आधुनिक शिक्षण, प्रशासकीय ऐक्य, सामाजिक-धार्मिक सुधारणा इत्यादी घटकांमुळे भारतात प्रबोधनाचा प्रवाह सुरू झाला. राष्ट्रवादी विचारसरणी विकसित झाली. राष्ट्रवादी भावनेच्या उत्कर्षातून समाजाचे राजकीय भान विस्तारत गेले. परिणामी जबाबदार शासन, लोकप्रातिनिधिक शासन, स्वराज्य आणि अंतिमत: पूर्ण स्वराज्यासाठी स्वातंत्र्य लढा उभारण्यात आला. या प्रक्रियेतूनच भारतीय संविधान सिध्द झाले. संविधान निर्मिती प्रक्रियेत दोन वरकरणी अंतर्विरोधी उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. एका बाजूला साम्राज्यवादी आणि शोषणात्मक ध्येय साध्य करण्यासाठी उत्क्रांत झालेल्या वसाहतवादी कारभार प्रक्रियेला जुळवून घेणे आणि दुसऱ्या बाजूला नव्या घटनात्मक व्यवस्थेत समतावादी आणि लोकशाही जाणीव निर्माण करते, ही ती प्रक्रिया होय. भारतीय राज्यघटनेची निर्मिती उत्तर - वासाहतिक कालखंडातील घटना निर्मितीचा पहिला महत्त्वपूर्ण प्रयत्न मानला जातो. भारतीय राज्यघटना ब्रिटीश वसाहतवादविरोधी लढ्यातून सिध्द झाली आहे.

भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेस स्वातंत्र्यलढ्याचा वारसा लाभला. राज्यघटनेच्या अनेक संकल्पनांचे मूळ स्वातंत्र्य चळवळीच्या वारशात आहे म्हणजेच ब्रिटीश राजवट आणि स्वातंत्र्य चळवळ यांतील आंतरक्रियेतूनच स्वतंत्र भारताच्या सांविधानिक चौकटीची रूपरेषा निर्माण झाली असे म्हणता येते. राष्ट्रवादाच्या बांधणीसाठी स्वीकारण्यात आलेले ऐतिहासिकतेचे तत्त्व धर्मनिरपेक्ष मानवतावाद, लोकांना सामावून घेणारी व त्यांना हक्क बहाल करणारी लोकशाही पध्दती ही मूल्ये स्वातंत्र्यलढ्यातूनच जन्मास आली. राष्ट्रीय क्राँगेसच्या मुख्य प्रवाहाबरोबरच फुले - आंबेडकर - पेरियार यांचा विद्रोही विचार, क्रांतिकारकांचा गट, डावे गट, शेतकरी व आदिवासीचे लढे, स्त्रियांचे-संघटन अशा अनेक समांतर प्रवाहांनी भारतीय स्वातंत्र्य लढा अधिक व्यापक आणि वैचारिकदृष्ट्या समृध्द बनवला. म्हणूनच भारतीय राज्यघटनेच्या निर्मिती प्रक्रियेवर या प्रवाहाचा लक्षणीय प्रभाव पडलेला दिसतो. भारतीय संविधानाने व्यक्ती आणि राज्य यांच्यातील वैधानिक संबंधात परिवर्तन आणले.

भारतीय संविधान इतर आधुनिक लोकशाही संविधानाप्रमाणेच सत्तेला मर्यादा घालणे, बहुसंख्याकवादयाच्या

धोक्यापासून समाजाचे रक्षण करणे आणि नियमाधारित राज्यकारभाराची हमी देणे या पारंपरिक उद्देशांची पूर्तता करतेच. मात्र त्याखेरीज इथल्या विशिष्ट सामाजिक संदर्भात पारंपारिक - श्रेणीव्यवस्थेच्या बेड्या तोडून स्वातंत्र्य, समता आणि न्यायाच्या नव्या युगात प्रवेश करण्यासाठी हे संविधान निर्माण करण्यात आले. त्यामुळे हे संविधान युगानुयुगे वंचित, उपेक्षित आणि शोषित जनसमूहांना सामुदायिक हित साध्य करण्याची सत्ता प्रदान करते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे राज्यघटनेतील या सविस्तर तरतुदींबरोबरच, स्वातंत्र्योत्तर काळातील घटनात्मक व्यवहाराचा देखील समावेश केला आहे. राज्यघटनेने भारतीय नागरिकांना धर्म, वंश, जात, लिंग इ. आधारे व्यक्तींमध्ये भेदभाव करता येणार नाही. तसेच सार्वजनिक सेवेमध्ये समान संधी, सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदान करण्याचा हक्क, सार्वत्रिक निवडणुका लढविण्याचा हक्क, इत्यादी हक्क प्रदान केले आहेत.

घटना समितीने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेचा स्वीकार करेपर्यंत 'भारतीय नागरिकत्व' अशी संकल्पना अस्तित्वात नव्हती. घटना स्वीकृत केल्यापासून नागरिकत्त्वाशी संबंधित कलम ५ ते ९ या तरतूदींची अंमलबजावणी सुरू झाली. तोपर्यंत ब्रिटीश भारतामध्ये राहणारे लोक राजपदाच्या अखत्यारित होते आणि ब्रिटीश जनतेप्रमाणे ब्रिटीश नागरिकत्त्व कायद्याव्दारे त्यांचे नियमन केले जाई. तर संस्थानांमधील जनतेला ब्रिटीश संरक्षित व्यक्तीचा दर्जा प्राप्त होता. भारताची फाळणी आणि प्रचंड मोठ्या प्रमाणात झालेल्या स्थलांतरामुळे नागरिकत्त्वाची निश्चिती करण्यामध्ये समस्या येत होत्या. राज्यघटनेतील नागरिकत्त्वाशी संबंधित तरतुदी करण्याकरिता मसुदा समितीला अनेकवेळा त्याबाबतचा मसुदा तयार करावा लागला आणि ती अंतिम करण्याकरिता सुमारे दोन वर्षे लागली. भारताची राज्यघटना खऱ्या अर्थाने लोक प्रातिनिधिक संस्थेद्वारे नव्हे तर अत्यंत मर्यादित स्वरूपाचे प्रातिनिधित्त्व असणाऱ्या घटना समितीव्दारे निर्माण केली अशी टीका केली जाते.



# ◈ राजे ◈

- कु. ज्योती गंगाराम कांबळे
टि.वाय.बी.ए.

काळ बदलला, परिस्थितीने कुस पालटली तरी शिवाजी राजे या नावेचे गारूड तसुभरही कमी झालेले नाही. उलटपक्षी बदलत्या संदर्भानिशी ते नव्याने समोर येते आणि आजही सळो की पळो करून आश्वस्त करणारे असे नेतृत्त्व प्रत्येक काळासाठी मिळायला हवे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये या सगळ्यांचे असे मापदंड देऊन ठेवले आहेत की, त्याचा अनुनय करण्याचा प्रयत्न केला तरी बरीच कल्याणकारी कामे मार्गी लागतील. म्हणूनच जयंती निमित्ताने राजांचे स्मरण करताना आजच्या काळात त्यांच्या विचारांचे महत्त्व काय, यावर चर्चा करणे गरजेचे ठरते. मुळात छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका साम्राज्याचे संस्थापक नव्हते तर एका आदर्श नेतृत्वाचे प्रतिक होते. त्यामुळे त्यांचे विचार आणि कार्याचे महत्त्व केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही तर आजही प्रत्येक भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे. सध्याच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीमध्ये त्यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. राजांचे नेतृत्त्व, ध्येयधोरणे पाहता ते दुरदृष्टीचे आणि आदर्शवादी राजे होते. त्यांनी स्वराज्य हा संकल्प उभा केला आणि त्यासाठी अपार परिश्रम घेतले. आजच्या काळातच विशेषतः तरूणांना नेतृत्त्व गुण आत्मसात करण्यासाठी व स्वतःचे ध्ये गाठण्यासाठी महाराजांच्या या जिद्दीचा आदर्श घेता येईल.

*“स्वराज्याची शान मराठ्याचा*
*अभिमान*
*आणि प्रत्येकाच्या*
*मनामनातील जान*
*म्हणजे छत्रपती शिवाजी*
*महाराज...”*

आज महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाच्या मनात या वीरपुरूषाच्या कथांमधून मिळालेले वीरश्रीचे बाळकडू पाझरले आहे. त्यांच्या जीवित कार्यातल्या प्रत्येक तेजोमय प्रसंगाने आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातला कोपरा उजळला आहे. आपल्याला राजांचा

परीचय नाही पण राजांची रणनीती मात्र आयुष्यातल्या बारीकसारीक प्रसंगामध्येही मार्गदर्शक ठरते. आता कोणी शाहिस्तेखान अफलखान आपल्यावर चालून येणार नाही. पण त्यांच्या कथा ऐकून मोठे झाल्यामुळे गोड बोलून पाठीत वार करू शकणाऱ्या प्रत्येक शत्रुपती आपण सजग राहत आहोत. शिवसाम्राज्यानंतर काही शतकांचा काळ उलटला असला तरी आजही प्रचंड उत्साहात आणि दिमाखात शिवरायांची जयंती साजरी होणे आणि प्रत्येक पिढीने तेवढ्याच आनंदाने त्याचा भाग होण्याचा प्रयत्न करणे हाच या व्यक्तिमत्त्वाचा गौरव आहे.

राजांबद्दल आपल्या प्रत्येकाच्या मनात प्रेमाबरोबरच भक्तीही आहे. ही भक्ती तो प्रतिपालक फुटायच्या वयापासून वृध्दत्वाची साद ऐकू येण्याच्या वयापर्यंत त्यांनी अनंत संकटांचा सामना केला. आपल्या मावळ्यांना प्राणपणे जपले. प्रजेवर पुत्रवत प्रेम केले. म्हणूनच तख्त इतिहास जमा झाले तरी छत्रपती महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या मनावर आरूढ आहेत. त्यांच्याप्रती असणारे मनामनातले प्रेम तसुभरही कमी झालेले नाही. स्वराज्य आणि शिवराय हे अव्दैत महाराष्ट्राच्या ललाटावरील टिळ्यासम आहे. आजही कोणताही गड चढताना इथे शिवप्रभुंची पायधूळ झडली असेल, या विचाने प्रत्येकजण भारावून जातो. रायगडावरील शिवरायांच्या प्रतिमा दृष्टीस पडताच डोळे भरून येतात, समाधीचे दर्शन घेताना प्रत्येकजण भारावून जातो. शिवरायांचा असा महिमा असल्यामूळेच महाराष्ट्राची माती देखील त्यांची जयंती साजरी करते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे शिवप्रभूंच्या चरीत्रातून घेण्यासारखे खूप काही आहे. किंबहूना त्यांच्या आय़ुष्यातील प्रत्येक अध्यायच अभ्यासण्याजोगा आहे. मावळे आणि सह्याद्री यांची साथ असल्याशिवाय संघर्ष सफल होणार नाही, हे या दृष्टीने आधीच ओळखले होते. यातूनच शिवबांना गडकोटांच्या अभ्यासाची आणि सामान्यजनांचे सुखदुःख जाणून घेण्याची प्रेरणा मिळाली. आदिलशाही सत्तेने आक्रमण करून शहाराजीराजांची जहांगिर बेचिराख केली. आधी गाढवाचा नांगर फिरवलेल्या पुण्याच्या भूमीवर जिजाऊंनी बारा वर्षांच्या शिवबांच्या हस्ते सोन्याचा नांगर फिरवला व सुवर्णकाळाचा आरंभ झाला. यवनांनी उद्ध्वस्त केलेल्या कसबा गणपती मंदिराचा शिवबांनी जीर्णोध्दार केला.

एका नव्या युगाला, आरंभाला गणेशाचे आशीर्वाद मिळाले. दुसरीकडे, शिवबांनी उदध्वस्त जहांगिरीची पुनर्रचना करण्यास सुरूवात केली. त्यांनी देशमुख-देशपांडे या वतनदारांच्या माध्यमातून रयेतशी संपर्क साधला व पुनर्वसाहतीसाठी नागरीकांचे सहकार्य मागितले. पण जनता अस्मानी व सुलतानी संकटाने ग्रासली होती. त्यांच्याकडे घालायला कपडा, पोटाला घास, दावणीला बैल व राहण्यासाठी निवारा नव्हता. जमीन पडीक होती. त्यांनी पडीक जमिन लागवडीखाली आणणाऱ्याला पाच वर्षे सारा माफ केला. सतराव्या शतकात अशा प्रकारे करमुक्त व्यवस्था निर्माण करून शिवबांनी पडीक जमिनी लागवडीखाली आणून कृषिप्रधान देश बनवण्याचा आरंभ केला. म्हणजेच त्यांच्या प्रयत्नाने एके काळच्या सुवर्णभारत नव्याने उदयाला येण्याची आशा निर्माण झाली.

*"सिंहाच्या जबड्यात घालून*
*हात*
*मोजीले दात ती जात*
*मराठ्यांची*
*असे हे शिवाजी महाराज..."*



# ◈ तर हे जगणे रंगीत आहे... ◈

- कु. सायराबानू अस्लम काझी
टि.वाय.बी.कॉम.

झुळूक कुणाला, कुणास वादळ, कुणी तरंगे लाटेवरती
कुणास आवडे काळा कातळ, कुणी रंगतो खाटेवरती!

कुणी भोगतो इहलोक हा, ध्यास कुणाला परलोकाचा
सत्तपीठच कुणा हवेसे, कुणी पिंपळाखाली आसुसे!

अजाण कोणी, कुणी जाणते, जुमानते, कुणी नच मानते
भारतामध्ये प्रत्येकाच्या गरजेपुरते धुन्यष्यबाण ते!

कोणी जगतो स्वतःपुरते, कुणी परायण परार्थ करण्या
लढतो कोणी सीमेवरती, देशाचे या रक्षण करण्या!

ज्योत झुंजते सूर्यासोबत, जगास दावित प्रकाशवाटा
कुणास वाटे गंमत भारी, बनुनि वाटेवरचा काटा!

रूप वेगळे, रंग लेवूनि, कोणी जग या आले केधवा
व्यष्टी समष्टि सृष्टी सारे, तुलाच ठाऊक बरे माधवा!

प्रत्येकाच्या गळ्यात जाणे, सुख-दुःखाचे संगीत आहे
एक दुज्याला घ्या सांभाळून, तर हे जगणे रंगीत आहे!



- **कु. सायराबानू अस्लम काझी**
टि.वाय.बी.कॉम.

## पाऊस

भरून आल्या आभाळाने
किती बरं लाडात यावं?

तासनतास वेड्यासारखं
चिंब चिंब बरसत रहावं!

थंड थंडीशी हलकीशी
हवेला मग हुल द्यावी...

छत्रीमधूनी चालत जाता
रस्त्याचीही भूल पडावी!

पावसाच्या पाण्यासोबत
आठवणींनी वाहत यावे...

हसू असूनी ओठांवरती
पापणीस का पूर यावे?

बिलोरी त्या थेंबामध्ये
आकाशाचे चित्र दिसावे!
आकाशाच्या मायोपोटी
सुंदर हिरवे स्वप्न फुलावे...

## गरिब

कोणाचा टी-शर्ट कोणाचा सदरा
गरीबांच्या नजरा भाकरीवर ॥१॥

स्वातंत्र्य मिळाले अमृतमहोत्सव आला
समाज विभागलेलाल जात-धर्मात ॥२॥

गरीबी हटाओ जय किसान
मिळाले का दान घोषणेचे ॥३॥

भोग्यांना टी.आर.पी. समस्यांना ठेंगा
स्तंभाचा लेंगा निसटतसे ॥४॥

कसल्या पदयात्रा कोठला न्याय
करमेना सत्तेशिवाय खानदानी ॥५॥

महात्मा गांधी असो सावरकर
सर्वच स्वातंत्र्यवीर देशासाठी ॥६॥

भ्रष्टाचार मुक्त समतेचा भारत
दिसावा सर्वत्र युवराज म्हणे ॥७॥

# ◈ थंडी ◈

**- श्री. सायराबानू अस्लम काझी**
टि.वाय.बी.कॉम (स्वरचित)

२०२४ हे वर्ष संपत आले
तेवढ्यातच थंडीचे दिवस लागले,

नव वर्षाची सुरुवात झाली
घ्या गुलाबी थंडीची लाट पसरली.

या दिवसात मज करावेसे अभ्यास कमी वाटते
कारण या दिवसात सुरुवात करणे कठीण होते.



**तापमानात झाली आहे मोठी घट**
**तरीही अंटार्टिका मधील बर्फ वितळत आहे पटपट.**

**डबल कंबल, टोपी, स्वेटर घालावे लागते**
**आणि या थंडीमध्ये अरीश उठावेसे वाटते.**

**रात्री घराच्या अंगणात शेकोटीची जाणीव झाली**
**रात्रीच्या गप्पांची मैफील रंगली.**

गोठवणाऱ्या थंडीने प्रत्येकाला हुडहुडी भरली
गरमागरम चहास व भजीस गर्दी झाली.

कधी कधी तर येतो या थंडीचा राग,
पण हीच थंडी आहे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग.

# ◈डॉ. बाबासाहेब आंबेडकर ◈

**- कु. सायराबानू अस्लम काझी,**
टि.वाय.बी.कॉम

आमचा श्वास, आमचा ध्यास
आमचा घास म्हणजे डॉ. आंबेडकर

आमचा मान, आमची शान
आमचा स्वाभिमान म्हणजे डॉ. आंबेडकर




आमचा नारा, आमचा सहारा,
आमचा देव्हारा म्हणजे डॉ. आंबेडकर

आमचा विचार आमचा आचार
आमचा प्रचार म्हणजे डॉ. आंबेडकर

आमचं गीत, आमचं संगीत
आमची प्रीत म्हणजे डॉ. आंबेडकर

आमची वाचा, आमची भाषा
आमची दिशा म्हणजे डॉ. आंबेडकर

आमची झुंड, आमचे बंड
आमचा पिंड म्हणजे डॉ आंबेडकर

आमचा झेंडा, आमचा दांडा
आमचा अजेंडा म्हणजे डॉ. आंबेडकर

आमचा भूतकाळ, आमचा वर्तमानकाळ
आमचा भविष्यकाळ म्हणजे डॉ. आंबेडकर

# ◈पुस्तकांची व्यथा ◈

- कु. सायराबानू अस्लम काझी
टि.वाय.बी.कॉम

पुस्तक म्हणे आता आम्ही आत्महत्याच करून घेतो
वाचवण्या आम्हा पुढे कोणी सरसावु नका...
देह जरी पडून राहिला कपाटातच आमचा
चिंता करून आम्हा परत हात लावु नका..



पुस्तकांची किंमत तुम्हाला तेव्हाच कळेल
जेव्हा पुन्हा एकदा अज्ञानाच्या अंधारात जाल...
ज्ञानाच्या उजेडात पुन्हा येण्यासाठी
मोबाईल नव्हे तर आम्हालाच हाक द्याल...

ज्या हातात आम्ही असायचो त्या जागी मोबाईल आला
अन् वाचाल तर वाचाल या उद्गाराचा परिणामच झाला नाही
ज्या ज्या संकटास आम्ही धावून आलो हो
तो तसा तुमचा मोबाईल कधी मदतीला आला नाही...

# ◈ पाऊस ◈

- **कु. अर्सिन अ.रहेमान गडकरी**
टि.वाय.बी.कॉम.

प्रेमासारखं पावसानेही
वादळ होऊन बरसू नये ...

प्रेमासोबत पावसाचीही
भीती मनात बसू नये ...

प्रेमाइतकाच सुंदर असतो
पाऊस रिमझीमणारा ...

उन्हात जरा मिठीत घेऊन
इंद्रधनूतून हसणारा ...

प्रेमासारखं पावसानेही
डोळा पाणी आणू नये ...

प्रेमासारखं पावसासोबत
सर्वस्व आपलं वाहू नये ...



# ◈ जीवनात आणखी काय हवं...? ◈

- कु. प्राची पडवळ
टि.वाय.बी.कॉम.

थोडेसे अन्न, थोडीशी भूक
थोडी मेहनत आणि थोडीशी कसरत...
जीवनात आणखी काय हवं... ?

थोडेसे भय, थोडीशी निराशा
थोडी इच्छा आणि थोडीशी आशा...
जीवनात आणखी काय हवं... ?




थोडेसे सुख, थोडीशी विश्रांती
थोडी भ्रमंती आणि थोडी शांती...
जीवनात आणखी काय हवं... ?

थोडेसे धन, थोडीशी संपत्ती
थोडी शक्ती आणि थोडीशी भक्ति...
जीवनात आणखी काय हवं... ?

थोडेसे विचार, थोडीशी सहनशिलता
थोडी क्रांति आणि थोडीशी शितलता...
जीवनात आणखी काय हवं... ?

थोडेसे संस्कार, थोडीशी संस्कृती
थोडे गुण आणि थोडीशी प्रगती...
जीवनात आणखी काय हवं... ?

# ◈ भारत ◈

- कु. पुनम ठोंबरे
टि.वाय.बी.ए.

जगात ज्याची मोठी शान
भारत आमुचा देश महान॥



भारताच्या डोक्यावर हिमालय मुकूटधारी
ताजमहालावर तर फिदा दुनिया सारी॥

रत्नांची नगरी आहे भारत
ऋषीमुनींनी लिहिली गीता-भागवत॥

राजेंनी उभारले शून्यातून स्वराज्य
त्यांनीच नष्ट केले मोगलांचे साम्राज्य॥

रामायणातले राम-लक्ष्मण, महाभारतातले कृष्ण-अर्जुन
इतिहासात आजही त्यांचे नाव घेतात आवर्जुन॥

संविधानिक मूल्ये, स्वातंत्र्य, समता, बंधुता
देशात नांदते राष्ट्रीय एकात्मता॥

देशा आमचा कृषिप्रधान, जगी, त्यांचा मोठा मान
जिंकू किंवा मरू हा नारा, जगी आमचा देशा प्यारा॥

# ◈ आठवण कॉलेजची ◈

- **कु. यश प्रफुल्ल धावडे,** टि.वाय.बी.ए.

रूप तुझं देखणं, आवड तुला गजऱ्याची
हसी तुझ्या गालावर, लाइन तुझ्या नजरेची॥

चालणं तुझं लय भारी, ठुमका तुझ्या कमरेचा
चिकणा-चिकणा दिसतोय झुमका तुझ्या कानाचा॥



आठवणीत तुझ्या रात्र-रात्र तळमळतोय
रोज कॉलेजला येऊन जीव तुला लावतोय॥

ए पोरी थोडं तरी जवळ मला घेणं
नाही सहन होत तुझं दूर-दूर जाणं॥

शब्द आहे प्रेमाचा रंग गुलाबी तुझ्या गालाचा
आता तरी दे मला इशारा तुझ्या प्रेमाचा॥

## थंडी थंडी

- **कु. निसर्गा धावडे,** एस.वाय.बी.कॉम

आली ती आली नुसतं सतावत असत
जरा म्हणून दम नाही तीला
अहो ती आपली गुलाबी थंडी.



डिसेंबर महिना हा थंडीचा
गारगार वारा आणि हळूच येणारी
ती थंडगार झुळूक आल्याचं सांगते.

म्हणते कशी मी आले
चला मऊ ऊबदार गोधडी काढा
शेकोटी पेटवा म्हणते

खूपच खट्याळ खोडकर आहे ही
गुलाबी थंडी...

# ◈ आला ऋतू थंडीचा ◈

- **कु. सुजानी पांचाळ,** टी.वाय.बी.ए.

*आला ऋतू थंडीचा*
*घेवून गारवा गुढ प्रमाचा*

*पहाटेचं ते गडद धुकं दाट*
*भावतो मनाला तो नागमोडी बाट घाट*

*दवात धरणी झाली ओली चिंब*
*मोती दिसे पडता त्यात सूर्याचे प्रतिबिंब*

*दिवस छोटा रात्र मोठी चाले हा लंपडाव*
*दाट धुक्यात कुठे हरवले माझे गाव*

*कडाक्याची थंडी शेकोटीपाशी आणून साडते*
*अनं सकाळी उठायची सवय का व मोडते*

*रोमटे अंगावर उभे करी झुळूक थंड हवेची*
*सुखावते आईच्या कुशीतली उब मायेची*

# ◈ थंडी ◈

- **कु. प्राची पडवळ,** टि.वाय.बी.कॉम.

*समुद्राने फेकलं म्हणून*
*शिंपल्यांनी रागवायचं नसतं*
*त्या कडाक्याच्या उन्हात सुद्धा*
*झुळूक बनून येणाऱ्या*
*थंड गारव्याला कधी विसरायचे नसतं*

*पाणी पिना है तो*
*गिलास से पियो*
*बिसलरी बोतल में*
*क्या रखा है?*

*ठंडी हवा खाने का इतना ही शौक है तो*
*थोडा बाहर आओ, आपके एसी में क्या रखा?*

*का उगीच किलबिल करतो पाखरांचा हा थवा*
*मंद-मंद झुळूक देतो थंड थंडशी हवा*
*थंडीमध्ये गवसू दे ही काया*
*पाणीदार डोळे हे अन् ही छाया*
*तुझा थंडावा, तुझा गारवा, दाखव मजला रीत तुझी*
*तुझे अन् माझे नाते शिकवी मजला ही प्रीत तुझी*
*थंडीच्या या लाटांमध्ये गुंफित बसले*
*मोहनमाळा गारव्याची*
*हवा साजरी, झुळूक लाजरी,*
*नवलपरी पण या थंडीची...*

# ◈ पहाटे धावताना भेटलेली थंडी ◈

**- कु. प्राची पडवळ,**
टि.वाय.बी.कॉम.

पहाटेचा तो गार वारा अंगावर उमटे, एक नवा शहारा,
धुक्यातले ते धुसर रस्ते अन् ते लुकलुकणारे तारे
धुक्यात रस्त्यांचा आम्ही अंदाज घेत थावणारे

धावता धावता आम्हांला ती भासत होती
अंगावर शहारे आणत होती
शोधत होतो आम्ही तीला, ती काही दिसतं नव्हती
तरीही तिची झुळूक मला छेडत होती.



न दिसणारी पण भासणारी, ती थंडी होती,
तशी थोडी ती घमेंडी होती.
सकाळी सकाळी आम्हाला गारठवत होती
गुलाबी गाल करून बसली होती.

काळ्या निळ्या आकाशातून,
सूर्य नाजूक किरण सोडत होता.
थंडीचा पहारा आता कमी होत होता.
हळूहळू सोनेरी किरण धरतीवर आली,
थंडी मात्र आता पळून गेली.

# ◈ निःशब्द संध्या सायंकाळी... ◈

***श्री. संदिप सक्रे,***
*लिपिक, श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल*

हसता, बोलता तुमची झाली...
निशब्द संध्या सायंकाळी,
काळ वेळाने डाव साधला...
केली आपुल्या संसाराची होळी

घडले सारे कसे अचानक
ना मजशी कळले नाथा
न बोलता तुम्हास मी
सोडून गेले या जगता

सांभाळा या गोड पिल्लांना
व्हा तुम्हीच माता-पिता,
भोळी भाबडी आपुली लाडकी
घाबरली आहेत मी जाता-जाता

आईच द्यावी माया आता
नका करू तुम्ही कंटाळा,
व्याकुळ झाली पिल्ले आपुली
लावा ममतेचा जिव्हाळा.

स्वप्न आपुली राहिली अधुरी
लागतील पूर्ण कराया तुम्हाला
नका एकटे समजू तुम्ही
मी आहे तुमच्या आजूबाजूला

येईन तुमच्या स्वप्नी सदा
सांगेन संसाराची महती,
अमर राहील सदा आपुली
ती वास्तवातील प्रिती.

संध्या तुमची दिसेल आता
त्या लुकलुकत्या ताऱ्यात
खंबीर व्हा तुम्ही आता
आठवणींच्या महाप्रलयात.



# ◈ पुनर्भेट... ◈

***श्री. संदिप सक्रे,***
*लिपिक, श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल*

*भेटायचं आहे पुन्हा तुला*
*अनोळखी होऊन,*
*करायचं आहे पुन्हा एकदा,*
*प्रेम तुझ्यावर भरभरुन॥*

*गंध तुझ्या श्वासातला,*
*यायचा आहे पुन्हा फिरुन,*
*रंग तुझ्या माझ्या मनातले,*
*पुन्हा उधळूया एक होऊन*

*सागराचा किनारा मी अन्*
*लाट तू होऊन ये...*
*किनाऱ्याला बिलगून तुझ्यात*
*मला सामावून घे...*

*सांग पुन्हा साथ जन्मांतरीची देशील ना?*
*पुन्हा एकदा नव्याने हात हाती घेशील का?*



*कोण तू अन् कोण मी*
*जाऊ सारे विसरुन*
*पुन्हा सुरु करु*
*जीवनाचे गीत नवीन*

*भेटायच आहे पुन्हा तुला*
*अनोळखी होऊन,*
*करायचं आहे पुन्हा एकदा,*
*प्रेम तुझ्यावर भरभरुन॥*

# ◈ हिंदि विभाग ◈

# अं त रं ग


| अ.क्र. | लेख / कविता का नाम | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी और फॅशन | कु. नेत्रा सुर्यकांत बावकर | ३८ |
| २ | भारतीय संस्कृति की देन | कु. दिक्षा दिपक गांगण | ४० |
| ३ | विश्‍व हिंदी दिवस | कु. सायराबानु अस्लम काझी | ४२ |
| ४ | मेरा प्रिय कवि | कु. ज्योती गंगाराम कांबळे | ४४ |
| ५ | माँ | कु. अनम अरमान कच्छी | ४७ |
| ६ | ताजमहल का इतिहास | कु. अर्सिन अ. रहेमान गडकरी | ५० |
| ७ | जिंदगी | कु. सायराबानु अस्लम काझी | ५४ |

# ◈ विद्यार्थी और फॅशन ◈

- **कु. नेत्रा सुर्यकांत बावकर,** एफ.वाय.बी.ए.

-

फॅशन सामाजिक विकास एवं युवा समय के साथ-साथ बदलते रहते है। फॅशन शब्द से आशय शिष्टाचार, रीती-रिवाज वस्त्रों (उनके रंगों उनकी सिलावट और उनकी आकृती) केश सज्जा (उसके विवीध रूप और प्रकार) रूप निखार और इसी प्रकार अनेक बातों के संबन्ध मे नित-नवीन उद्‌भावनाओं से है।

भारतीय समाज में विद्यार्थी वर्ग फॅशन के संस्कारों से बुरी तरह ग्रस्त है। आज का विद्यार्थी फॅशन में किसी से पिछे नही है। आज के विद्यार्थी को पढाई की उतनी चिंता नही है, जितनी की उसे अपने आप को सजाने सवारने की है। घंटो शिशे के सामने खडे होकर अपने बाल संवारना उनकी दिनचर्या मे शामील हो गयी है। यह विद्या प्राप्ती के मुल लक्ष्य को भुलकर समाज का अंधानुकरण कर रहे है और फॅशन के गुलाम बन गये है। वह तंग वस्त्र, नए-नए डिजाइन और साज श्रृंगार मे पुरी तरह घिर गया है। आज उनका शिक्षक गुरू न होकर टेलर मास्टर है, उसका विद्यालय सिनेमा भवन और रेस्टॉरेंट है उनकी पाठ्यपुस्तक फॅशन का यह ज्वर नगरों तक ही सीमीत नही रहा; बल्कि ग्रामों तक में फैल गया है। सीधे सादे ढंग से रहने वाला छात्र आज बुध्दू, मुर्ख और गणेश जी कह कर पुकारा जाता है। फॅशन न करने पर मित्र मंडळी में दुत्कारा जाता है। तथाकथिक शिक्षित समाज में ठुकराया जाता है। फलतः अधिकांश विद्यार्थी फॅशन के पीछे दिवाने हो गये है।

कपडो में फॅशन बहुत आम है। सबसे अधिक इसका प्रभाव स्कूल तथा कॉलेज के बच्चोंपर है। वे हर समय अप टु डेट होकर रहना पसंद करते है। वे पढाई की तरफ ध्यान न देकर अपने बाल, टाई तथा कॉलर ठिक करने मे ही लगे रहते है। लडके आजकल के नविन कपडे पहनते है। अधिकांश दुसरे मित्रों को जिन्स वस्त्रों मे देखते है, वैसे ही वस्त्रों की माँग अपने माता-पितासे करते है। लडकियाँ भी फैशन के प्रति उतनी ही सक्रीय है। वे तंग फिटिंग के कपडे पहनती है। बिना बाजु वाली कमीजे, छोटे कपडे पहनती है। वे स्वयं को खुबसुरत बनाने के लिए पढाई को छोडकर घंटा ब्युटी पार्लर मे बैठी रहती है। इसके अतिरिक्त बालों मे सुगंधित तेल लगाना, बढिया कपडे पहनना, उनपर तरह-तरह के महेगे सेंट छिडकना, हाथ मे मोबाईल, मोटर साईकल पर इधर-उधर व्यर्थ घुमना, फिरना आज विद्यार्थीयों मे एक फॅशन बन चुका है। लेकीन यह सब वह दुसरों की तुलना मे अधिक धनवान दिखने के लिए करते है।

इस प्रकार की फैशन-परस्ती के रोग का मुल कारण सिनेमा और टेलिव्हिजन है। टेलिव्हिजन आजकल विज्ञापन का सबसे सशक्त माध्यम है। लगभग सभी विद्यार्थी यहा तक की गावों और झुग्गी-झोपडीयों मे रहने वाले भी टेलिव्हिजन के अत्याधिक शौकीन है। अतः टेलिव्हीजन पर दिखाये जाने

वाले विज्ञापनों, कार्यक्रमो और फिल्मों से विद्यार्थीयों का प्रभावित एवं गुमराह होना स्वाभाविक है। विद्यार्थी टेलिव्हिजन के पर्दे पर जिन नई-नई वस्तूओं, सज्जा विधीओं सौंदर्य उत्पादनों और व्यक्तित्व को अनुठी दमक देने की विधाओं के विज्ञापन देखता और उनकी प्रभावोत्पकता की बात सुनता है, उनसे अवश्य प्रभावित होत है, और फलतः उसमें उन्हें प्राप्त करने या अपनाने की लालसा बलवती होती जाती है। फिल्मों के अभिनेता और अभिनेत्रीयोंके वस्त्र, जीवन-शैली, रूप-सज्जा और यहाँ तक की शिष्टाचार एवं व्यसन आदि भी इन बालकों के मन पर प्रभाव डालते है और किशोर बालक उनकी नकल करने की कौशीश में लग जाता है। उनकी तरह बोलने की नकल करना यह सब फिल्मों का असर है। यह फैशन की प्रेरणा है।

जैसे-जैसे विद्यार्थीयोंमे फैशन की तीव्रता बढती है तब उनमे विलासता भी बढती है। विद्यार्थीयों को अपनी विलासिता की पूर्तता के लिए धन आवश्यक होता है। धनी परवारों मे तो इसके वर्ग के परिवारों मे (आर्थिक दृष्टी से जो कुछ दुर्बल एवं संस्कारों मे अनुदार होते है।) इसका कुप्रभाव पड रहा है। ऐसे परिवारों मे (मध्यम वर्ग) मे फैशन मे धन का अपव्यय होता है और एक अटपटी सभ्यता की अति गम्भीर स्थिती पैदा हो जाती है, जब फैशन के लिए मां-बाप से धन न मिलने पर बच्चे मे मां-बाप के प्रती आक्रोश और विद्रोह की भावना तैयार होने लगती है या फिर फैशन की ललक पुरी करने हैतू बच्चे सहि-गलत सभी तरिकों से धन प्राप्त करने की चेष्टा मे बुरी आदतो या गलत सोहबत के शिकार बन जाते है।

फैशन की बढती हुई प्रवृत्ती केवल विद्यार्थियो के लिए हि नहि बल्की पुरे समाज के लिए भी घातक सिध्द हो रही है। कई बार माता-पिता जिससे विद्यार्थीयों की जरूरतों को पुरा नहि कर पाते जिससे विद्यार्थी जिद्दी और हट्टी स्वभाव के बन जाते है। कई बार विद्यार्थी सिनेमा हॉलोंमे जाकर लोगों से अशोभनीय व्यवहार करते है, गली मोहल्लों मे दंगा मचाते है और कई बार समाजमे अशोभनीय वर्तन करते है। फैशन परस्त विद्यार्थी अपनी पढाई ठीक प्रकार से नही कर पाते जिससे माता-पिता जो उनसे आशाएँ लगाए बैठे होते हे, उनकी सारी आशाओं पर पानी फिर जाता है।

विद्यार्थीयों को फैशन परस्ती से हर हाल मे बचना चाहिए और 'हमेशा ही साधा जीवन और उच्च विचार' के आदर्श के अनुसार अपना जीवन व्यतित करना चाहिए। फैशन एक व्यर्थ की चीज है। यह केवल हमारी बाहरी सुन्दरता दर्शाती है। व्यक्ती की असल खुबसुरती उसके व्यक्तित्व में होती है। हमारे जीवन का उद्देश्य साधा जीवन तथा ऊँची सोच होनी चाहिए। विद्यार्थी का लक्ष्य उच्च शिक्षा प्राप्त कर अपने लक्ष्य को पाना होना चाहिए। विद्यालय के अध्यापक एवं अध्यापकीय आदर्श होने चाहिए न की फिल्मी अभिनेता या अभिनेत्रीयोंकी।

# ◈ भारतीय संस्कृति की देन ◈

**- कु. दिक्षा दिपक गांगण,** एस.वाय.बी.कॉम.

भारतीय संस्कृति पर कुछ कहने से पहले मैं यह निवेदन कर देना कर्तव्य समझती हूँ की मैं संस्कृति को किसी देश-विशेष या जाति-विशेष की अपनी मौलिकता नहीं मानती। मेरे विचार सारे संसार के मनुष्यों की एक ही सामान्य मानव-संस्कृति हो सकती है। यह दुसरी बात है कि वह व्यापक संस्कृति अबतक सारे संसार में अनुभूती और अंगीकृत नहीं हो सकी है। नाना ऐतिहासिक परंपराओं के भीतर से गुजर कर और भौगोलिक परिस्थितीयों मे रहकर संसार के भिन्न-भिन्न समुदायों ने उस महान मानवीय संस्कृति के भिन्न-भिन्न पहलूओं का साक्षात्कार किया है। नाना प्रकार की धार्मिक साधनाओं, कलात्मक प्रयत्नों और सेवा, भक्ति तथा योगमूलक अनुभूतियों के भीतर से मनुष्य उस महान सत्य के व्यापक और परिपूर्ण रूप को क्रमशः प्राप्त करता जा रहा है, जिसे हम संस्कृति शब्द व्दारा व्यक्त करते हैं। यह संस्कृति शब्द बहूत अधिक प्रचलित है तथापि यह अस्पष्ट रूप में ही समजा जाता है। इसकी सर्वसम्मत कोई परिभाषा नही बन सकी है। प्रत्येक व्यक्ती अपनी रूची और संस्कारों के अनुसार इसका अर्थ समझ लेता है।

जो आदमी ऐसा विश्वास करता है, उससे संस्कृति के साथ भारतीय विशेषण जोड़ने का अर्थ पुछना नितांत संगत है। क्या भारतीय से मतलब भारतवर्ष के समस्त भारतीय संस्कार अच्छे-बुरे प्रयत्न और संस्कार है? नही; समस्त भारतीय संस्कार अच्छे ही हैं या मनुष्य की सर्वोत्तम साधना की ओर अग्रेसर करने वाले ही है, ऐसा मैं नहीं मानता। ऐसा देखा गया है की एक जाती ने जिस बात को अपना अत्यंत महत्वपुर्ण संस्कार माना है। वह दूसरी जाति की सर्वोत्तम साधना के साथ मेल नहीं खाता। ऐसा भी हो सकता है की एक जाती के संस्कार दूसरे जातिके संस्कार के एकदम उलटे पड़ते हो।

**प्रसिद्ध संतर-रज्जबदास ने कहा था -**

सब साँच मिली सो साँच है ना मिले सो झूठ। पूर्ण सत्य अविरोधी होता है। जहाँ भी अविरोधी दिखे वहाँ सोचने की जरूरत होगी। हो सकता है कि दोनों मे से एक सही हो और दूसरा गलत। शायद अभी हो सकता है की दोनो सही रास्ते पर हों पर उनके दृष्टीकोण गलत हो। यदी हमें अपनी गलती मालूम हो तो उसे निर्मम भाव से छोड देना होगा। महाभारत ने बहूत पहले घोषणा की थी कि जो धर्म दूसरे धर्म को बाधित करता है, वह धर्म नहीं है कुधर्म है। सच्चा धर्म अविरोधी होत है -

*धर्मो या बाधते धर्म नस धर्मः कुधर्म तत् ।*
*अविरोधी तूयो धर्मः स धर्मो युतिसत्तम।।*

मैं जब भारतीय विशेषण जोड़कर संस्कृति शब्द का प्रयोग करती हूँ तो मैं भारतवर्ष व्दारा अधिगत और साक्षात्कृत अविरोधी धर्म की ही बात करती हूँ। अपनी विशेष भौगोलिक परिस्थिती में

और विशेष ऐतिहासिक परंपरा के भीतर से मनूष्य के सर्वोत्तम को प्रकाशित करने के लिए इस देश के लोगों ने भी कुछ प्रयत्न किए हैं। भिन्न-भिन्न देशों और भिन्न-भिन्न जातियों के अनुभूत और सक्षात्कृत अन्य अविरोधी धर्मो की भाँति वह मनूष्य की जययात्रा में सहाय्यक है। वही भारतीय संस्कृति है। उसको प्रकट करना, उसकी व्याख्या करना या उसको प्रकट करना, उसकी व्याख्या करना या उसके प्रति जिज्ञासा-भाव उचित है। इसी महान उद्देश के लिए उसका अध्ययन, मनन और प्रकाशन होना चाहिए।

यह जो हमारे बाह्यकरण है - कर्मेंद्रीय और ज्ञानेंद्रिय है - ये हमारे अत्यंत स्थूल प्रयोजनों के निवर्तक है। मन से इनसे सूक्ष्म है, बुद्धी और भी सूक्ष्म है। मन से हम गज की लंबाई की भी एकाएक धारणा नही कर सकते पर बुद्धी द्वारा ज्योतिषी कोटी-कोटी प्रकाश वर्षों में फैले हूए ग्रह-नक्षत्रों की नाप-जोख किंया करते हैं। परंतू बुद्धी भी बडी चीज नहीं है। बुद्धी से भी बढकर कोई वस्तू है। वह अंतरमन है। गीतामें कहा है -

*इंन्द्रियाणी पराव्यहरिन्द्रियेभ्यः पर मनः।*
*मनस्तू पराबुद्ध्योंबुध्द पर तस्तू तः।।*

तैत्तरीय उपनिषध मैं भृगूवलयी वरूण के पुत्र भृगू की मनोरंजक कथा दी हुई है। भृगू ने जाकर वरूण से कहा था कि हे भगवान मै ब्रम्ह को जानना चाहता हूँ। पिता ने तप करने की आज्ञा दी। कठीन, तपस्या के बाद पुत्र ने समझा-अन्न ही ब्रम्हा हैं। पिता ने फिर तप करने को कहा। इसबार पुत्र कुछ और गहराई मे गया। उसने प्राण को ही ब्रम्हा समझा। पिता को संतोष नही हुआ। उन्हों ने पुत्र को पुनः तप करने के लिए कहा। पुत्र ने फिर तप किया और समझा की मन ही ब्रम्हा है। पिता फिर भी असंतुष्ट ही रहे। फिर तप किया तब पूत्र ने समझा की विज्ञान ही ब्रम्ह है। पर पिता को अब भी संतोष नहीं हुआ। पूनवीर कठिण तप के बाद पूत्र ने समझा आनंद ही ब्रम्हा है। यही चरम सत्य था। इस प्रकार अन्न, प्राण, मन, विज्ञान, आनंद ये ही ज्ञान पाँच स्तर है। ये उत्तरोत्तर सूक्ष्म है। साधारणतः इनको आश्रय करके दो-दोन प्रकार के मत बन जाते है।

आज हम सांस्कृतिक दृष्टी से जो बहूत नीचे गिर गए है उसका प्रधान कारण यही है की हम इस महान आदर्श को भूल गए है। मेरा विश्वास है की इन आदर्श को नई परिस्थितीयों के अनूकूल बनाकर ग्रहन करने से हम तो ऊपर उठेंगे ही सारे संसार को भी उसमें कुछ - न कुछ ऐसा अवश्य मिलेगा, जिससे उसे वर्तमान भयंकर अवस्था से उबरने का मौका मिले।

भारतवर्ष ने सामान्य मानवीय संस्कृति को पूर्ण और व्यापक बनाने की जो महती साधना की है। उसके प्रत्येक पहलू का अध्ययन और प्रकाशन हमारा अत्यंत महत्वपूर्ण कर्तव्य होना चाहिए।

# ◈ विश्व हिंदी दिवस ◈

- **कु. सायराबानु अस्लम काझी,** टि.वाय.बी.कॉम.

१० जनवरी को विश्व हिन्दी दिवस मनाया जाता है। 'विश्व हिन्दी दिवस' की शुरुआत उस दिन को याद करने के लिए की गई थी, जब सन ४ अक्तूबर १९७७ में संयुक्त राष्ट्र महासभा में पहली बार हिन्दी बोली गई थी। १० से १४ जनवरी १९७५ में महाराष्ट्र के में पहला नागपूर वैश्विक हिन्दी सम्मेलन आयोजित किया गया था। इस सम्मेलन में ३० देशों के १२२ प्रतिनिधीयों ने हिस्सा लिया था। साल १९७५ में तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी ने पहले विश्व हिन्दी सम्मेलन का उद्‌घाटन किया था। भारत के पूर्व प्रधानमंत्री मनमोहन सिंह ने १०, जनवरी २००६ को हर साल विश्व हिन्दी दिवस मनाने की घोषणा की थी। हर साल विश्व हिन्दी दिवस के दिन अलग-अलग थीम होती है। साल २०२४ में विश्व हिन्दी दिवस की थीम थी - "हिन्दी पारंपारीक ज्ञान से कृत्रिम बुद्‌धीमत्ता को जोडना।" वैश्विक स्तर पर हिन्दी को लेकर पहले सम्मेलन आयोजन १० जनवरी १९७५ को महाराष्ट्र के नागपुर में किया गया था। इस सम्मेलन में ३० देशों के १२२ प्रतिनिधीयों ने भाग लिया था।

साल १९७५ में तत्कालिन प्रधान मंत्री इंदिरा गांधी ने प्रथम विश्व हिन्दी सम्मेलन का उध्दाटन किया था । इसका उददेश्य हिन्दी को राष्ट्रीय स्तर पर प्रसारीत करना था। १४ सितंबर १९४९ को भारतीय सविधान सभा ने हिंदी को देवनागरी लिपी में भारत की राजभाषा के रूप में स्वीकार किया। भारत में प्रथम विश्व हिंदी दिवस वर्ष २००६ में तत्कालीन प्रधान मंत्री डॉक्टर मनमोहन सिंह ने १० जनवरी को मनाया था, सभी से यह दिवस विश्व हिन्दी दिवस के रूप में मनाया जाता रहा है। भारत के प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने विषय हिंदी दिवस पर अपने संदेश में हिंदी प्रेमीयों को हार्दिक शुभकामनाएँ दि हैं। जनतांत्रिक आधार पर हिंदी विश्व भाषा हैं, क्योंकी उसके बोलने समझने वालों की संख्या संख्याओं में बसी हैं। विश्व के १३२ देशों में जा बसे भारतीय

मूल के लगभग २ करोड़ के लोग हिंदी माध्यम से ही अपना कार्य निर्धारित करते हैं। एशियाई संस्कृती में अपनी विशिष्ट भूमिका के कारण हिंदी एशियाई भाषाओं से अधिक एशिया की प्रतिनिधी भाषा है। साल १९७५ में भारत, मॉरिसिस, युनाइटेड किंगडम, त्रिनिदाद और टोबैगो, संयुक्त राज्य अमेरीका जैसे विभिन्न देशों में विश्व हिंदी सम्मेलन का आयोजन किया गया।

केंद्रिय हिंदी निदेशालय, जिसकी स्थापना १९६० में भारत सरकार व्दारा की गई थी और जो शिक्षा मंत्रालय के अधीन कार्य करता है। उसका प्राथमिक लक्ष्य हिंदी भाषा का संवर्धन और प्रसार करना है। अनेक विदेशी महाविद्यालयों और संस्थानों में "हिंदी पीठों" की स्थापना विश्वभर में हिंदी को बढ़ावा देने के लिए भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (ICCR) व्दारा उठाए गए कदमों मे से एक है हिंदी राजभाषा एक मल्टीमिडीया आधारीत बुद्धिमान स्वं. शिक्षण अनुप्रयोग है, जिसे हिंदी सिखने के लिए डिजाइन किया गया है। राजभाषा विभाग ने हिंदी के प्रयास को बढ़ावा देने के लिए सूचना प्रौद्योगिकी का उपयोग करते हुए ई-महाशब्दकोश मोबाइल ॲप और ई-सरल हिंदी वाक्य कोष जैसे कार्यक्रम शुरू किए है। हिंदी में उल्लेखनीय उपलब्धियों को मान्यता देने और पुरस्कृत करने के लिए राजभाषा किती पुरस्कार और राजभाषा गौरव पुरस्कार जैसे पुरस्कार कार्यक्रम शुरू किए गए है। यह पुरस्कार हिंदी भाषा को बढ़ावा देने के लिए व्यक्तियों और संगठनों को सम्मानित करते है। विश्व हिंदी दिवस पर लोक भाषा को बढावा देने के लिए सांस्कृतिक गतिविधियों, शैक्षणिक पहलुओं और हिंदी- भाषा वार्तालापों में भाग ले सकते हैं या उनकी मेजबानी कर सकते हैं। हिंदी साहित्य को पढ़कर सुनाना, हिंदी भाषा की शिक्षा को प्रोत्साहीत करना और सोशल मिडीया पर हिंदी के बारे में जानकारी प्रसारीत करके भी प्रभावी ढंग से योगदान दिया जा सकता हैं।

# ◈मेरा प्रिय कवि ◈

- **ज्योती गंगाराम कांबळे,** टि.वाय.बी.ए.

किशोरावस्था के दौर में कविता लिखना, कविता पढ़ना, कविता सुनाना हर किशोरवईन लड़के का एक शौक हुआ करता है। थोडी सी साहित्यिक समझ आने के साथ ही मुझे भी कवि बनने का शौक हुआ। हमने भी अन्य छात्रों की देखा देखी कविताएं लिखाना और कविताएं सुनाना प्रारंभ किया। किंतु, विशेष रुचि न होने की वजह से यह शौक थोड़े ही दिनों में धुल धुसित हो गया। किंतु सभी कवियों की लिखी गई कविताओ को पढने, सुनने का जो आनंद मुझे प्राप्त हुआ, वह अभी तक बरकरार है। यही वजह है कि आज यहाँ जहाँ कही भी कवि सम्मेलन या मुशायरों का आयोजन होता है। मैं वहाँ जाने से अपने -आप को नहीं रोक पाता हूँ। रही कविता पढने की बात तो मैंने स्वाधीनता के बाद की कविताए पढ़ी, मध्य-काल की कविताएं पढ़ी, किंतु मुझे कबीर ने जीतना प्रभावित किया, उतना किसी अन्य कवि ने मुझे प्रभावित नही किया।

कबीर का जन्म कहाँ, किस परिवार में, किस जाति में धर्म में हुआ। यह बात हमारे लिए कोई मायने नहीं रखती। मैं तो सिर्फ इतना जानता हूँ कि कबीर ने सब प्रकार के भेदभाव से ऊपर उठकर मनुष्य- मात्र बनकर जीने और मनुष्यता और मानवता को सर्वोपरि रखने की जो जिद, मैंने कबीर में देखी है, वैसी मैंने किसी अन्य कवि में नहीं देखी। निम्न जाति में पलने के कारण तरह के सामाजिक रूढ़ियो के प्रति जो विद्रोह कबीर में दिखाई देता है वह किसी अन्य कवि मे हमें दिखाई नही देता।

स्वामी रामानंद के दीक्षा न देने से कबीर गंगा की सीढ़ियों पर अंधेरे में लेट जाते है पर भी और उन्हें ही गुरु मान लेते है। किंतु कबीर के राम दृढ निश्चयी अयोध्या के दशरथपुत्र राम नही है। वे निर्गुण निराकार रूप मे हर प्राणी में तथा हर पदार्थ में वास करने वाले राम हैं। कबीर पढे-लिखे नहीं हैं किंतु उनके ज्ञान चक्षु पुरी तरह से खुले हुए है। वे खुद कहते हैं...

"मसि कागद छुयों नही कलम गहयो नहिं हाथ" किंतु कबीर ने सांसारिक जीवन की पाठशाला में बैठ- कुछ देखा है, सुना है, भोगा है उसी की अनुभितयों को अपनी ज्ञान भरी वाणी में प्रकट किया है। उनका यह अनुभव ही सहज रूप में उनकी कविता बनकर हमारे सामने आया है। इसीलिए कवि कहते है...
"लोग कहते पोथी की लेखी मैं कहता आँखिन की देखी।"

कबीर जी का यह आँखो से देखना आम जनता ही नहीं बल्कि विद्‌वतजन की कसौटी पर भी खरा उतरता है। सच तो यह है कि कबीर ने कविता लिखने या कविता रचने का प्रयास नहीं किया है। उन्होंने अपनी प्रतिभा का प्रदर्शन किया और न ही उन्होंने अपना प्रदर्शन किया। अपने जीवन में जो दिखा, सुना, सीखा और उन्हीं में से निकले तत्व से ही कविता बना दी।

कबीर कविता कहने में भाषा को तवज्जों नहीं देता वे भाव को तवज्जो देते हैं। भाव व्यक्त करने के लिए यदि भाषा को तोड़ना मरोड़ना पड़े तो वे उससे परहेज नहीं करते। इसीलिए कबीर को वाणी का डिक्टेटर भी कहा जाता है।

कवि के रूप में कबीर की सबसे बड़ी विशेषता यह है की जीवन के अनेक प्रकार के अनुभव तत्वों को जन मानस के सामने सहज ढंग मे प्रस्तुत कर देना। कबीर की विशेषता यह है कि, जीवन के अनेक प्रकार के अनुभुत तत्वों को जन मानस के सामने लाना। भक्ति और आधात्म साधना के क्षेत्र में रहते हुए भी जीवन के जिस यथार्थ का चित्रण कबीर ने किया। मेरे विचार से आजतक कोई कवि नहीं कर सका है। कबीरदास जी एक सतर्क कवि के साथ एक बहुत बडे समाज सुधारक भी है। वे अपनी कविता के माध्यम से समाज मे धर्म और जाति-पाँति के नाम से फल-फूल रहे अंधविश्वासों पर करारी चोट करते हैं। वे न तो हिंदू को छोड़ते है और न ही मुसलमानों को छोड़ते है। वे जहाँ पर मुसलमानों को ललकारते हुए कहते है...

"कांकर - पाथर जोड़ि के, मस्जिद लेइ बनाय
ता भीतर मुल्ला बांग दे, क्या बहरा हुआ ख़ुदाय।।

इसी प्रकार हिंदुओ के व्रत-उपवास का विरोध करते हुए जपमाला और तिलक को व्यर्थ बताकर मन को काबू में रखने की प्रेरणा देते है। वे कहते हैं..."

"हिंदु धरत एकादशी साधें दुध सिंघाडा सेती ।

अन्न को त्याग, मन नहिं हटकै, पारण करें संगोती।" कबीर सभी धर्म को समान मानते हैं। वे ईश्वर अल्लाह, राम- रहीम में भेद नही करते है। उन्होंने सत्य, आहिंसा, इंन्द्रिय निग्रह, सर्वधर्म समभाव, जाति पाति का खंडन तथा आचार-विचार की शुध्दता पर बल दिया है। वे प्रवृत्ति से घुमक्कड थे। वे जहाँ गए, वहाँ की भाषा में उन्होंने अपनी बात कही। यह सारी बातें उन्हे एक विशुद्ध राष्ट्रवादी और उससे भी बढ़कर मानवतावादी चिंतक और कवि प्रमाणित करती है। इन्हीं गुणों के आधार पर मैं कबीर को अपना प्रिय एवं सर्वश्रेष्ठ कवि मानती हुँ।

कबीर के काव्य के माध्यम से भारत के कण-कण को जगाने का प्रयास किया है। कबीर भारतीय संस्कृति और भारतीय जनता के सच्चे प्रतिनिधि थे। उनका हृदय देशभक्ति से भरा हुआ था। उनका स्वदेश प्रेम उनके काव्यों में वास्तविक चित्रण हुआ है। गुप्त जी हिंदी भाषा और साहित्य के शिल्पी थे। सरल - सुगम हिंदी उनकी कविता का प्रधान गुण है। फिर कवियों में से किसी एक कवि को अपना 'प्रिय' बताना बहुत, मुश्किल है। फिर भी मैं राष्ट्रकवि स्वर्गीय 'कबीर' को अपना प्रिय कवि मानती हूँ।

प्राचीनता के पुजारी होते हुए भी गुप्त जी नवीनता का स्वागत करने में किसी से पीछे नहीं रहे। 'भारत भारती' में उन्होंने भारत की तत्कालीन दशा का जो मार्मिक चित्र खींचा है, उसमें उनका उद्देश्य भारतीयों को देश के प्रति जाग्रत करना था। 'साकेत' मे राम का जो रूप प्रस्तुत किया है, वह उनकी राष्ट्रीय भावना के अनुरूप है।

कबीर राष्ट्रभाषा हिंदी के प्रतिनिधी और लोकप्रिय कवि थे उन्होंने लगभग ६० साल तक लगातार हिंदी साहित्य को सँवारा - सजाया और उनके काव्य रत्नों से उसे समृद्ध किया। उनकी कविता में नारी - जीवन की करुणा, देश की दुर्दशा, अस्पृश्यता निवारण, प्रकृति एवं मानव - जीवन की भिन्न-भिन्न झाँकिया मिलती हैं। कबीर जी हिंदी के ही नहीं, भारतीय साहित्य के गौरव है। उन्होंने देश की जनता के हृदय - सिंहासन पर अपना स्थान बना लिया था। भारतीय संस्कृति और मानवता के ऐसे महान गायक और कवी यही है।

# ◈ माँ ◈

- कु. अनम उस्मान कच्छी,

- एफ.वाय.बी.ए.

*"उसके होने से जीवन में कोई गम नही होता,*
*एक माँ का प्यार कभी कम नहीं होता।"*

माँ ,इस एक शब्द के अंदर पूरी दुनिया समाई हुई है। माँ के बिना परिवार ऐसा लगता है मानों परिवार में से एक कीमती हीरा गायब है, जिसकी किंमत कोई नहीं लगा सकता है। वो दिन-रात अपने बच्चों और परिवार के अन्य सदस्यों की हर ख्वाहिशों का खयाल रखती है। बलिदानों की मूरत होती है माँ। माँ वह है जो हमें जन्म देने के साथ ही हमारा लालन-पालन भी करती हैं। माँ के इस रिश्तों को दुनिया में सबसे ज्यादा सम्मान दिया जाता है। मेरी माँ मेरे जीवन में सारी महत्वपूर्ण भूमिकाएं निभाती है। मेरी माँ मेरे जीवन का आधारस्तंभ है। वह मेरी पहली शिक्षक, डॉक्टर और दोस्त है। जब मैं किसी समस्याएँ में होती हूँ, तो वह मुझमें विश्वास पैदा करने का कार्य करती है। आज मै अपने जीवन में जो कुछ भी हूं वह सिर्फ अपने माँ के ही बदौलत हूँ। क्योंकि मेरी सफलता तथा असफलता दोनो ही वक्त वह मेरे साथ थी।

मेरी माँ मुझे हमेशा सीधे रास्ते पर चलने की सीख देती है। वह मुझे एक अच्छा इंसान बनने और गरीब व असहाय लोगों की मदत करने हेतु प्रेरित करती है। मैं अपनी माँ से बहुत प्यार करती हूँ। उनके बिना तो मैं अपने जीवन की कल्पना भी नही कर सकती। यही कारण है की मैं अपनी माँ को अपना आदर्श और सबसे अच्छी दोस्त मानती हूँ। मैं जीवन में कभी उनका कर्ज तो नहीं उतार सकती, लेकीन मैं उनका हर सपना साकार करूंगी, और यह हमेशा ध्यान रखूंगी की मेरी वजह से कभी भी उनका सर नीचे न हो। माँ-बच्चे की रिश्ते की खूबसूरती यह है कि उसके प्यार और बलिदान की कोई सीमा नही है। माँ हमे सामाजिक व्यवहार से लेकर ईमानदारी तथा मेहनत जैसी महत्वपूर्ण शिक्षाएँ देती है।

यह सबको पता है कि एक स्त्री अपने जीवन में पत्नी, बेटी, बहू जैसे ना जाने कितने रिश्ते निभाती है, लेकीन इन सभी रिश्तों में से जिस रिश्ते को सबसे ज्यादा सम्मान प्राप्त है वह माँ का रिश्ता है। मातृत्व ऐसा बंधन है जिसकी व्याख्या

शब्दों में नही की जा सकती। कुछ भी हो जाए लेकीन एक माँ का उसके बच्चो के प्रति प्यार कभी भी कम नही हो सकता। वह खुद से भी जादा अपने बच्चे के सुख-सुविधाओं को लेकर चितिंत रहती है। इसलिए माँ को प्रेम व करूणा का प्रतीक माना गया है। एक माँ अपने बच्चे की रक्षा के लिए बड़ी से बड़ी विपदा का सामना करने का साहस रखती है। एक माँ चाहे जितने भी कष्ट सह ले लेकीन अपने बच्चों पर किसी तरह की आंच नही आने देती। इन्हीं कारणों से, माँ को ईश्वर का रूप माना गया है, और इसलिए एक कहावत भी काफी लोकप्रिय है कि "ईश्वर हर जगह मौजूद नहीं रह सकता है, इसलिए उसने माँ को बनाया है।"

हर एक के जीवन में माँ ही एक ऐसी होती जो हमारे दिल में किसी और की जगह नहीं ले सकती। वो प्रकृती की तरह है जो हमेशा हमको देने के लिए जानी जाती है, बदले में बिना कुछ भी लिए। उसे अपने जीवन के पहले पल से देखते है जब इस दुनिया में हम अपनी आँखे खोलते है। जब हम बोलना शुरू करते है, तो हमारा पहला शब्द होता है माँ। जब हम पैदा होते वक्त हम कुछ भी नहीं जानते और कुछ भी करने के लिए लायक नहीं होते और वह माँ ही होती है जो हमे अपनी गोद मे बडा करती है। वह हमें इस काबील बनाती है कि हम दुनिया को समज सके और अपने जीवन में कुछ कर सके। वह हमेशा हमारे लिए उपलब्ध रहती है ईश्वर की तरह हमारी परवरिश करती है। अगर इस धरती पर कोई भगवान है तो, वो हमारी माँ है। कोई भी हमें माँ की तरह प्यार और परवरिश नही कर सकता और कोई भी - उसकी तरह अपना सबकुछ हमारे लिए बलिदान नहीं कर सकता। वह हमारे जीवन की सबसे बेहतरीन महिला होती है जिसकी जगह किसी के भी द्वारा भविष्य में नही बदली जा सकती। इस दुनिया में किसी भी चीज को माँ के सच्चे प्यार और परवरिश से नहीं तौला जा सकता।

सच्चे प्यार का दुसरा नाम है, "माँ" जो केवल एक माँ हो सकती है। उस समय से जब हम उसकी कोख में आते है और दुनिया में आते है पूरे जीवन भर उसके साथ रहते है। माँ से अनमोल कोई भी नहीं जो भगवान के द्वारा आशीर्वाद समान होता है इसलिए हमे ईश्वर का आभारी होना चाहिए। वो सच्चे प्यार, परवरिश और बलिदान का अवतार होती है। वह एक ऐसी व्यक्ती है जो पहली बार हमारे स्कूल की शुरुआत घर में ही करती है हमारे जीवन की सबसे पहली और प्यारी शिक्षक होती है। वह हमें जीवन का सच्चा दर्शन और व्यवहार करने का तरीका

सीखाती है। इस दुनिया में हमारे जीवन के शुरू होते ही हमें प्यार करती है और हमारा ध्यान रखती है अर्थात उसके कोख में आने से वह बहुत दुख और पीडा सहकर वो हमें जन्म देती है, लेकिन इसके बदले में वो हमें प्यार देती है। इस दुनिया में कोई भी ऐसा प्यार नहीं है जो बहुत मजबूत, हमेशा के लिए है, निस्वार्थ हो। शुद्ध और समर्पित हो। वह हमारे जीवन में स्थित अंधकार को दूर करके रोशनी भरती है। वह हमेशा हमें जीवन में सही दिशा की ओर आगे बढ़ाती है और सबसे खास बात हमारे जीवन में खुशियाँ फैलाती है। वह हमे छोटे और असमर्थ बच्चे से मानसिक, शारीरिक, सामाजिक और बौद्धिक मनुष्य बनाती है। वह हमेशा हमारा पक्ष लेती है और भगवान से हमारे स्वास्थ्य और अच्छे भविष्य के लिए पूरे जीवन भर प्रार्थना करती है।

माँ हमें जितना प्यार करती है, उतना ही माँ हमें जीवन के हर उतार चढाव में आगे बढाने की प्रेरणा भी देती है। माँ ही अपने बच्चों को बहुत करीब और गहराई से जानती है। माँ की जरूरत हमे हमेशा होती है। इससे कोई फर्क नही पडता कि हम जीवन में कहाँ, हैं, चाहे वे स्कूल जाना शुरू कर रहे हो, विदेश जाने की सोच रहे हो या जिंदगी में किसी बड़ी कठिनाईयों से गुझर रहे हो, हमे हमेशा अपनी माँ की मदद की जरूरत होती है। माँ अपने बच्चो को स्कूल जाने से पहले ही एक टिचर की तरह सीखाती है। बच्चे अपनी माँ से जो सीखते है वो शिक्षा उन्हें कोई नही दे सकता। जब इस दुनिया में प्यार, ईमानदारी और सच्चाई के बारे में सोचतें है, तो सबसे पहले माँ का चेहरा सामने होता है। मेरे जीवन में अगर किसी इंसान की महत्वपूर्ण भूमिक है वो सिर्फ मेरी माँ की है, जब हमें कोई चीज खाने की इच्छी होती है तो वो बिना आलस किये हमारे लिए तुरंत उसे बनाती है, कभी कभी तो वो खूद भूखी सो जाती है, लेकिन कभी ये नहीं कहती की आज ये चीज नहीं है। माँ के जैसा त्याग कोई नही कर सकता।

हम कितने भी बडे क्यों न हो जाए पर अपनी माँ को हमेशा वही प्यार और सम्मान देना चाहिए और कभी ये नहीं भूलना चाहिए उसने हमारे जीवन के लिए क्या त्याग किये हैं।

# ◈ ताजमहल का इतिहास ◈

**- कु. अर्सिन अ. रहेमान गडकरी**
टि.वाय.बी.कॉम.

जैसे ही हम भारत के आगरा शहर का नाम सुनते हैं, सबसे पहले हमारे जहन में ताजमहल ही आता है। सफेद संगमरमर से बना यह महल असीम प्रेम की निशानी है। ताजमहल का निर्माण मुगल शासक शाहजहाँ ने करवाया था। यह दुनिया के सात अजूबों (Seven Wonders of The World) में से एक है। ताजमहल को युनेस्को द्वारा विश्व धरोहर स्थल घोषित किया गया है। यह विश्व धरोहर के रूप में पूरे विश्व द्वारा साराहे जाने वाला "अति उत्तम मानवीय कृतियों" में से एक कहलाया गया। इस अति उत्तम कृति के बारे में ऐसा माना जाता है कि शाहजहाँ ने इसका निर्माण करवाने के बाद अपने सभी कारीगरों के हाथ कटवा दिए ताकि कोई और दूसरा इस तरह की ताजमहल जैसी कोई इमारत नहीं बना पाए।

कै. हरी तुकाराम खापणे सृस्तिप्रित्यर्थ राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले जाते. यावर्षी या स्पर्धेसाठी विविध विविध विद्यापीठांमध्ये सतरा निबंध आले होते. यामध्ये प्रथम क्रमांक कु. प्रगती मनिषा संजय शिंदे (आठल्ये, सप्रे- पित्रे महाविद्यालय, देवरुख ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी) या विद्यार्थिनीस मिळाला. तर व्दितीय क्रमांक कु. अनुराधा आनंदा डोंगरे (देशभक्त आदंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स ॲन्ड सायन्स कॉलेज, यशवंतराव चिखली ता. शिराळा, जि. सांगली) या विद्यार्थिनीने मिळविला, तर तृतीय क्रमांक कु.साहिल दिलीप आग्रे (पाटपन्हाळे आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, पाटपन्हाळे ता. गुहागर, जि. रत्नागिरी या विद्यार्थ्यांने मिळविला. दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी संविधान गौरव महोत्सवानिमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु.निसर्गा पांडुरंग धावडे (एस. वाय. बी.कॉम.), द्वितीय क्रमांक कु.सज्ञानी समीर घागरे (एस. वाय. बी. ए.) तर तृतीय क्रमांक कु सायली संतोष गुरव (टी. वाय. बी. कॉम.) या विद्यार्थिनींनी पटकावला.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

**- सही. प्रा. पी.पी.राठोड व डॉ. बी. टी. दाभाडे**

सांस्कृतिक विभाग




दि.०१/०८/२०२४ रोजी लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सहा.प्रा. सुभाष धोंगडे




दि.२०/०८/२०२४ रोजी स्वागत समारंभ कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना संस्थेचे सरचिटणीस मा. नरेश पाचलकर




दि. ०५/०९/२०२४ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतिनिमित्त प्रतिमेचे पुजन करताना सहा.प्रा. एस. जी. चव्हाण




दि. ०२/१०/२०२४ रोजी म. गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतिनिमित्त प्रतिमा पूजन करताना प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे



दि. १०/१०/२०२४ रोजी नवरात्रोत्सवानिमित्त सरस्वती देवीची पुजा करताना एफ.वाय.बी.कॉम. विद्यार्थी साहिल नार्वेकर




दि. २६/११/२०२४ रोजी संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याबाबत मार्गदर्शन करताना प्रा. पी. पी. राठोड



दि. ६/१२/२२०४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन करताना सहा.प्रा. एस. जी. चव्हाण




वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दि. २०/०१/२०२५ रोजी प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे स्वरूप सांगताना डॉ. बी. टी. दाभाडे




वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दि. २१/०१/२०२५ रोजी टाय डे व सारी डे या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी व विद्यार्थिनी



वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दि. २२/०१/२०२५ रोजी आयोजित खानाखजाना कार्यक्रमाचे उद्घाटन करताना परीक्षक




दि. २६/०६/२०२४ रोजी छ. शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे



दि.२१/०७/२०२४ रोजी महाविद्यालयाच्या ३०व्या वर्धापना दिनानिमित्त उपस्थित विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना मा. चंद्रकांत लिंगायत




वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दि. २३/०१/२०२५ रोजी आयोजित केलेल्या पारंपरिक वेषभूषेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी



दि. ०८/०२/२०२५ रोजी विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन करताना संस्थेचे अध्यक्ष मा. मनोहरजी खापणे साहेब व इतर मान्यवर




दि. ०८/०२/२०२५ रोजी विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटना प्रसंगी मार्गदर्शन करताना मान्यवर




दि. ०७/०२/२०२५ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रसिध्द कवी डॉ. एकनाथ पाटील व उपस्थित मान्यवर




दि. १९/०२/२०२५ रोजी छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतिनिमित्त प्रतिमा पूजन करताना डॉ. ए. डी. पाटील

# ◈ राष्ट्रीय सेवा योजना विभाग नियमित उपक्रम ◈

राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता १०० विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. या विभागामार्फत ५ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त संस्था अध्यक्ष श्री मनोहरजी खापणे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी नारळ, आंबा अशा पन्नास रोपांची लागण करण्यात आली. २१ जून रोजी प्रा. एन. जी. देवन यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. १८ जुलै रोजी विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जांभूळ, फणस, कोकम अशा दीडशे रोपांची लागण करण्यात आली. २६ जुलै रोजी रस्त्यावर पडलेले झाड विद्यार्थ्यांनी तोडून बाजूला करून रस्ता मोकळा केला. टी. डब्लू. जे. ट्रेडविजाझ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन ऑगस्ट रोजी दोनशे रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. रायपाटण तंटामुक्त समितीचे अध्यक्ष ४ ऑगस्ट रोजी जुन्या वह्यातील कागद संकलन करून नवीन वह्या बनवण्यात आल्या. श्री. प्रभाकर पळसुलेदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठाशी हितगुज हा कार्यक्रम पाच ऑगस्ट रोजी घेण्यात आला. झाले. राजापूरच्या नायब तहसीलदार सौ. शेळके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली आठ ऑगस्ट रोजी युवा संवाद हा कार्यक्रम घेण्यात आला. १३ ऑगस्ट रोजी तिरंगा रॅली काढण्यात आली. १४ ऑगस्ट रोजी दत्तक गाव येरडव येथे स्वच्छता करण्यात आली. १५ ऑगस्ट रोजी हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत माजी सैनिक श्री सिताराम पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी स्वतंत्रता शपथ घेण्यात आली. ३० ऑगस्ट रोजी प्लॅनिंग सेशन टीबीके महाविद्यालय खेड येथे संपन्न दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या काळात 'स्वच्छता ही सेवा' हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत सावर्डा कॉलेजचे प्राचार्य प्रा.टी.वाय.कांबळे यांचे व्याख्यान संपन्न झाले. या उपक्रमांतर्गत रायपाटण, हरळ, पाचल बाजारपेठेत स्वच्छता करण्यात आली. याबरोबरच पथनाट्य, रॅली , गटचर्चा,व्याख्यान असे विविध उपक्रम संपन्न झाले. दोन ऑक्टोंबर रोजी पाचल बाजारपेठेत स्वच्छता करण्यात आली यावेळी विद्यार्थ्यांनी दोन गाडी कचरा गोळा केला. शुभम गोरुले यांने सात ते १७ नोव्हेंबर पर्यंत अमरावती येथे झालेला राज्यस्तरीय आव्हान कॅम्प पूर्ण केला. त्याबरोबरच दीक्षा गांगण व निसर्गा धावडे यांनी लांजा येथील एलटीपी कॅम्प पूर्ण केला. १९ ऑक्टोबर रोजी मतदार जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले. १ डिसेंबर ते ८ डिसेंबर या कालावधीतील एड्स सप्ताह अंतर्गत व्याख्यान,निबंध स्पर्धा,,गटचर्चा जनजागृतीपर पत्रक वाटप असे विविध उपक्रम घेण्यात आले. १० जानेवारी रोजी वह्या बनवण्यात आल्या. या दिवशी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी शिबिर संपन्न झाले. वह्यांचे वाटप जिजामाता हायस्कूल रायपाटण येथे ११ जानेवारी रोजी करण्यात आले. १६ जानेवारी रोजी सार्वजनिक आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. २२ जानेवारी रोजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले. यावेळी २० विद्यार्थ्यांना हेल्मेट वाटप

करण्यात आले. २५ जानेवारी मतदार दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मतदार शपथ आदी उपक्रम घेण्यात आले. ३० जानेवारी रोजी राजापूर लांजा नागरिक संघ आयोजित ग्रामीण साहित्य संमेलनाची ज्योत पाचल बाजारपेठेतून ठरवण्यात आली. एक फेब्रुवारी रोजी उगवाई मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आली. असे विविध उपक्रम वर्षभरात घेण्यात आले.



'स्वच्छता ही सेवा' उपक्रमा अंतर्गत वृक्षारोपण करताना नॅक पियर टीमचे अध्यक्ष मंगलुरु विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पी. सुब्रमण्यम येडापडीथया, उत्तर प्रदेशातील दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठ गोरखपूरचे प्रोफेसर डॉ. अजय गुप्ता, तामिळनाडूच्या एच. एच. राजेश कॉलेजचे प्राचार्य डॉ. थिरूसेलवम चिन्नईय्यान, संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणे व उपस्थित मान्यवर




आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन करताना सहा. प्रा. एन. जी. देवन



विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त वृक्षारोपण करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे व उपस्थित मान्यवर



पाचल हरळ रस्त्यावर पडलेले झाड रस्त्यावरून हटवताना एनएसएस स्वयंसेवक



ज्येष्ठाशी हितगुज कार्यक्रमात युवाईसी संवाद साधताना माजी मुख्याध्यापक श्री. गोविंद करंदीकर, रायपाटण तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष श्री. प्रभाकर पळसुलेदेसाई व उपस्थित मान्यवर



महाविद्यालय व टी. डब्ल्यू. जे. ट्रेड-विजाज यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करताना ट्रेड विजाजचे सहाय्यक व्यवस्थापक श्री. साहिल घाग व उपस्थित मान्यवर




'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत 'चला स्वच्छतेचा जागर करूया' या विषयावर मार्गदर्शन करताना सावर्डा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. टी. वाय. कांबळे व उपस्थित मान्यवर



'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत रायपाटण पिकअपशेड स्वच्छता करताना स्वयंसेवक




एनएसएस स्थापना दिन कार्यक्रमात बोलताना कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही. एस.पाटील व उपस्थित मान्यवर



'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत गांधी जयंती निमित्त आयोजित स्वच्छता उपक्रमाचे उद्घाटन करताना पाचलचे सरपंच
श्री. बाबालाल फरास व उपस्थित मान्यवर



'स्वच्छता ही सेवा' उपक्रमा अंतर्गत पाचल बाजारपेठेत स्वच्छता करताना एनएसएस स्वयंसेवक




एड्स सप्ताह अंतर्गत 'एड्स आजार आणि उपचार' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. एस. पाटील, कार्यक्रम अधिकारी सहा. प्रा. एम. डी. देवरुखकर, सहा. प्रा. एस. जी. चव्हाण व उपस्थित मान्यवर




जुन्या वहीतील कोऱ्या कागदापासून नव्या वह्या बनवताना स्वयंसेवक




'आरोग्याची काळजी' या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. जगदीश पाटील व उपस्थित मान्यवर




जुन्या वह्यांपासून बनवलेल्या नव्या वह्या जिजामाता विद्यामंदिर रायपाटण येथे वाटप करताना कार्यक्रम अधिकारी डॉ. विकास पाटील व उपस्थित मान्यवर



आरोग्य तपासणी शिबिरात प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांची तपासणी करताना आरोग्य अधिकारी



राष्ट्रीय मतदार दिनी मतदार शपथ घेताना स्वयंसेवक व मान्यवर




राजापूर लांजा तालुका नागरिक संघ आयोजित दहाव्या ग्रामीण साहित्य संमेलनाच्या क्रांतीज्योतीचे पाचल येथे पूजन करताना प्र. प्राचार्य डॉ.पी. एस.मेश्राम व उपस्थित मान्यवर



येरडव ते अनुस्कुरा या ऐतिहासिक शिवकालीन पायवाटेवर असणाऱ्या शिलालेखाच्या वाचनाचा प्रयत्न करताना पुरातत्व विभागाचे अधिकारी व स्वयंसेवक




संविधान गौरव महोत्सव कार्यक्रमात 'संविधान भारताचा आधार' या विषयावर बोलताना डॉ. विकास पाटील व उपस्थित मान्यवर



‘हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत महाविद्यालयात ध्वजारोहण करताना माजी सैनिक श्री. सिताराम पवार व उपस्थित मान्यवर

‘हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत काढण्यात आलेली तिरंगा रॅली






राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेची पाहणी करताना मान्यवर

# ◈ विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर अहवाल ◈

**दि. १७ ते २३ डिसेंबर २०२४**

श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर दि. १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०२४ रोजी येरडव मुक्कामी संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे सरचिटणीस श्री.नरेश पाचलकर यांच्या हस्ते तर सरपंच श्रीमती उज्वला बेर्डे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

या कार्यक्रमास राजापूर लांजा तालुका नागरिक संघ मुंबईचे अध्यक्ष श्री सुभाष लाड, सर्व ग्रामपंचायत सदस्य, येरडव ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. उमेश ज्ञा. दळवी आदी मान्यवर होते. दुपारच्या सत्रात ग्रामपंचायत परिसर, दत्त मंदिर परिसर, पाटीलवाडी पिकअप शेड परिसर स्वच्छता करण्यात आली व नियोजन करण्यात आले. दि. १८ रोजी सकाळच्या सत्रात ग्रामपंचायत परिसरात गटर खुदाई करण्यात आली.

दुपारच्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार श्री. विनोद पवार यांचे 'कोकणातील व्यवसायाच्या संधी' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. सायंकाळच्या सत्रात सर्वेक्षण व खेळ घेण्यात आले. दि. १९ रोजी सकाळच्या सत्रात बोधिसत्व नगर व वरचा पाठ या ठिकाणी दोन वनराई बंधारे बांधण्यात आले. दुपारच्या सत्रात जीवन आनंद संस्था मुंबईचे संस्थापक श्री. संदीप परब यांचे 'युवक आणि सामाजिक बांधिलकी' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात पाटीलवाडी व झांब्याचा पाठ या ठिकाणी दोन वनराई बंधारे बांधण्यात आले तर दुपारच्या सत्रात 'फळबाग रोप निर्मिती आणि व्यवसाय' या विषयावर समर्थ नर्सरीचे संस्थापक श्री. अमर खामकर यांचे व्याख्यान संपन्न झाले.

शनिवार दि. २१ रोजी सकाळच्या सत्रात उगवाई ते येरडव अशा ऐतिहासिक पायवाटेची दुरुस्ती करण्यात आली. या पायवाटेवरील ऐतिहासिक शिलालेख, कात्याळात असणारा झरा, उगवाई मंदिर परिसर स्वच्छता, ऐतिहासिक काळातील असणाऱ्या नाका परिसरात स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या सत्रात माता भगिनींसाठी हळदीकुंकू समारंभ संपन्न झाला. रात्रीच्या सत्रात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. राहुल मराठे यांचे 'नाटक आणि मी' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. यावेळी लांजा महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के. आर. चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

दि. २२ डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात गांगो मंदिर पायाभरणीचे दगड टाकने, हनुमान मंदिर परिसर स्वच्छता, हनुमानवाडी पिकअप शेड स्वच्छता, सावंतवाडी परिसर स्वच्छता करण्यात आली. यावेळी श्री. अशोक दळवी यांचा टॉयलेट साठी खड्डा खणण्यात आला. दुपारच्या सत्रात 'पत्रकारिता

आणि आजचा युवक' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार श्री. सुरेश गुडेकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. रात्री मनोरंजन आणि प्रबोधन यांचा संगम साधणारा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. सोमवार दि. २३ डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात शोष खड्डे खुदाई करण्यात आली. दुपारच्या सत्रात संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर यांच्या अध्यक्षतेखाली समारोप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी 'स्नेहबंध' हे विद्यार्थ्यांनी सात दिवसातील आपल्या अनुभवांचे केलेल्या लेखनाचे हस्तलिखित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.

या शिबिरात बेस्ट स्वयंसेवक म्हणून भरत गोरुले व बेस्ट स्वयंसेविका म्हणून ऋतुजा पांचाळ यांना गौरवण्यात आले. बेस्ट डायरी लेखनाचा सन्मान निसर्गा धावडे हिने पटकावला. या शिबिरातील सर्व ग्रुप ना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही.एस. पाटील यांनी तर आभार प्रा.एम.डी. देवरुखकर यांनी मानले. अशा प्रकारे सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले.



(राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराचे उद्घाटन करताना संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर, प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम व उपस्थित मान्यवर)

(विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरातील स्वयंसेवक भरत गोरुले याला बेस्ट स्वयंसेवक पुरस्काराने गौरवताना महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम व उपस्थित मान्यवर)





(विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी येरडव ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. उमेश दळवी यांचा सत्कार करताना सहा. प्रा. एम. डी. देवरुखकर उपस्थित मान्यवर)



(जि. प. पूर्ण प्राथमिक शाळा नं. १ येरडव येथे स्वच्छता करताना स्वयंसेवक)



(ग्रामपंचायत येरडव परिसरात गटार खुदाई करताना स्वयंसेवक)



('कोकणातील व्यवसायाच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना ज्येष्ठ पत्रकार श्री. विनोद पवार, श्री. शरद पळसुलेदेसाई व मान्यवर)



(अर्जुना नदीवर वनराई बंधारा घालताना स्वयंसेवक)



(अर्जुना नदीवरील पूर्ण झालेला वनराई बंधारा)



(विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात खेळातून प्रबोधन करताना जीवन आनंद संस्था, मुंबईचे श्री. संदीप परब)



(येरडव वरची कोंड येथे स्वयंसेवकांनी घातलेला वनराई बंधारा)



(येरडव ते अनुस्कुरा या ऐतिहासिक पायवाटेवरील झऱ्याची स्वच्छता करताना स्वयंसेवक)



(येरडव ते अनुस्कुरा या ऐतिहासिक पायवाटेवर ऊन पावसात धूळ खात पडलेला शिलालेख)



(येरडव अनुस्कुरा मार्गावरील झाडाझुडपात वेढलेल्या पांडवकालीन ऐतिहासिक उगवाई मंदिराची स्वच्छता करताना स्वयंसेवक)



(येरडव ते उगवाई या ऐतिहासिक पायवाटेची स्वच्छता करताना स्वयंसेवक)



(येरडव ते अनुस्कुरा या मार्गावर असणाऱ्या पांडवकालीन ऐतिहासिक उगवाई मंदिराची स्वच्छता)



(महिलांसाठी आयोजित हळदीकुंकू समारंभात संगीत खुर्ची स्पर्धेत सहभागी स्थानिक माता-भगिनी)



(शिबिरात मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ.राहुल मराठे)



(येरडव येथील गांगो मंदिराच्या पायाभरणी प्रसंगी पायात दगड टाकताना स्वयंसेवक)




हनुमानवाडी पीकअप शेड स्वच्छता करताना



श्री. मधुकर दळवी यांच्या परसात शौचखड्डा खुदाई करताना



(शिबिरात प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करताना संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर व उपस्थित मान्यवर)



(स्वयंसेवकांच्या अनुभवांचे हस्तलिखित 'स्नेहबंध' चे प्रकाशन संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर, प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम व उपस्थित मान्यवर)

# ◈ बी.सी.स्कॉलरशिप/बुक बँक/मैत्री संघ/एडवाइझरी विभाग ◈

महाविद्यालयातील बीसी स्कॉलरशिप/बी.सी. बुक बँक/मैत्री संघ/ॲडव्हायझरी विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षांमध्ये या शैक्षणिक वर्षातील पहिलीं सभा दि. १५/०७/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता प्राचार्यांच्या कक्षात संपन्न झाली त्यामध्ये विभागाच्या कार्याचे वार्षिक नियोजन करण्यात आले. त्यानुसार भारत सरकारच्या विविध योजना शिष्यवृत्ती व विविध सामाजिक संस्था द्वारा दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती संबंधित विद्यार्थ्यांची बैठक घेऊन विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्याचे निश्चित केले व त्यानुसार वर्षभरामध्ये वारंवार शिष्यवृत्ती संबंधित बैठका घेऊन मार्गदर्शन करण्यात आले आहे त्यानुसार बऱ्याच विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती राजश्री शाहू शिष्यवृत्ती साठी अर्ज केले आहेत. सुभद्राबाई शिक्षण निधी संस्था मुंबई यांच्याकडेही बऱ्याच विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते पैकी १२ विद्यार्थ्यांना पाच हजार रुपये प्रमाणे ६०,००० रुपये शिष्यवृत्ती पोटी मिळाले आहेत.

चालू शैक्षणिक वर्षात आपल्या विभागाच्या बीसी बुक बँक योजनेअंतर्गत महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांना ७५४ पुस्तकांचे नियमित वितरण करण्यात आले आहे आजपर्यंत विभागाकडे ७५४ पुस्तके उपलब्ध आहेत पैकी ३२ पुस्तकांची खरेदी यावर्षी करण्यात आली आहे या विभागाच्या खर्चासाठी मुंबई विद्यापीठामार्फत ९००० चे अनुदान प्राप्त झाले आहे. या अनुदानाचा वापर विद्यापीठाच्या नियम निकषानुसार करण्यात आलेला आहे व याचे वार्षिक ऑडिट देखील करण्यात आले आहे अशाप्रकारे या विभागाच्या वतीने वर्षभरामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले या कार्यासाठी सहाय्यक प्रा डॉ. दाभाडे, ग्रंथालय प्रमुख डॉ. कोंडागुर्ले, कार्यालयीन प्रमुख लिपिक राजेश चव्हाण यांचे या विभागाला अनमोल सहकार्य लाभले.

- सहा.प्रा.सुभाष धोंगडे
  विभाग प्रमुख




विविध शिष्यवृत्ती संबंधी मार्गदर्शन करताना विभाग प्रमुख सहा. प्रा. श्री. सुभाष धोंगडे

# ◈ नेचर क्लब ◈

आपल्या महाविद्यालयाच्या नेचर क्लब विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षासाठी वर्षाच्या सुरुवातीसच वार्षिक नियोजन करण्यात आले व त्यानुसार वर्षभर कार्यक्रम राबविण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून २९ जानेवारी २०२५ रोजी नेचर क्लब च्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साठी वनभोजन कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले होते. मुलांना निसर्गाच्या सानिध्यात घेऊन जाणे हा त्या पाठचा उद्देश होता. त्यानुसार रायपाटण येथील वडचाई मंदिर परिसरात वनभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये महाविद्यालयाच्या ६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या वनभोजनासाठी उपस्थित होते अशा प्रकारे या विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**- सहा. प्रा. सुभाष धोंगडे**
विभाग प्रमुख

# ◈ क्रीडा महोत्सव अहवाल ◈

महाविद्यालयाच्या सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षीच्या क्रीडा स्पर्धा या गुरुवार दि. १६/०१/२०२५ ते शनिवार दि. १८/०१/२०२५ या कालावधीमध्ये अति उत्साहाने संपन्न झाल्या. क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. ए. डी. पाटील यांच्या हस्ते टॉस उडवून करण्यात आले. यावेळी १०० मी., २०० मी., ४०० मी. धावणे, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक या वैयक्तिक स्पर्धा तर कबड्डी, खो-खो, क्रिकेट, रस्सीखेच या सांघिक स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

विभाग प्रमुख
**प्रा. एस. व्ही. निंबाळकर**
जिमखाना विभाग




वार्षिक क्रीडा स्पर्धेत कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करताना सीनियर प्रा. डॉ .ए.डी.पाटील




वार्षिक क्रीडा महोत्सवात कबड्डीच्या एका उत्कंठावर्तक क्षणी रमलेले विद्यार्थी




वार्षिक क्रीडा स्पर्धेत मुलींच्या १०० मीटर धावण्याची स्पर्धा घेत असताना
विभाग प्रमुख प्रा. एस. व्ही.निंबाळकर



वार्षिक क्रीडा स्पर्धेत रस्सीखेच स्पर्धेची सुरुवात करताना
प्रा. एस. व्ही.निंबाळकर

# ◈ स्पर्धा परीक्षा आणि करिअर गाईडन्स विभाग अहवाल ◈

महाविद्यामध्ये स्पर्धा परीक्षा आणि करिअर गाईडन्स विभागामार्फत विविध कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षाबद्दल गोडी निर्माण करण्याचे काम केले जाते. निलया फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने महाविद्यालयात करिअर गाईडन्स या विषयावर प्रा. चेतन गोडबोले यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या करिअर कट्टा या उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले आहे. कंपनी सेक्रेटरी या करिअर बद्दल जागृती करण्यासाठी विभागामार्फत एम.ओ.यु. करण्यात आला असून कोल्हापूर चॅप्टर मार्फत महाविद्यालयात युवा संवाद कार्यक्रमेच आयोजन करण्यात आले होते. यावेळी राजापूरच्या नायब तहसीलदार सौ. शेळके आणि महसूल विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

**- डॉ. ए. डी. पाटील**
विभाग प्रमुख




(निलया फाउंडेशन पुणे आयोजित करिअर गायडन्स या उपक्रमामध्ये मार्गदर्शन करताना प्रा. चेतन गोडबोले)




(करिअर गायडन्स उपक्रमामध्ये मनोगत व्यक्त करताना कु. नेत्रा बावकर)




(शासनाच्या विविध योजना बद्दल माहिती देताना श्री. पाटील साहेब)




(युवा संवाद कार्यक्रमात बोलताना राजापूरच्या मा. नायब तहसीलदार शेळके मॅडम)

# ◈ महिला विकास कक्ष अहवाल ◈

महिला विकास कक्षांतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यार्थिनींच्या विकासासाठी अनेक उपक्रम घेण्यात आले. ते खालीलप्रमाणे -

१) महिला विकास कक्षामार्फत दि. २२/०९/२०२४ रोजी ‘महिला सुरक्षा व शिष्यवृत्ती‘ या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

२) महिला विकास कक्षाअंतर्गत दि. ०३/०१/२०२५ रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. विद्यार्थिनींनी 'स्त्रियांचे समाजातील स्थान' या विषयावर मनोगत व्यक्त केले तसेच सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला.

३) महिला विकास कक्षामर्फत दि. ०४/०१/२०२५ पासून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कॉम्प्युटर व टेलरिंग हे दोन कोर्स सुरू करण्यात आले.

४) महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षाच्या वतीने शुक्रवार दि. १०/०१/२०२५ रोजी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सर्व मुलींचे 'रक्तगट व हिमोग्लोबिन' तपासणी करून त्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

५) महाविद्यालयातील महिला विकास कक्षामार्फत महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची दि. १४/०१/२०२५ रोजी आरोग्य तपासणी रायपाटण हॉस्पिटल येथे करण्यात आली.

६) महिला विकास कक्षाअंतर्गत महिला तक्रार निवारण समिती आयोजित दि. २२/०१/२०२५ रोजी 'रस्ता सुरक्षा अभियान‘ कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये राजश्री पाटील मॅडम प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होत्या. तसेच हेल्मेट वापराबद्दल जागृती करून महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींना मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले.

७) महिला विकास कक्षामार्फत संविधान गौरव महोत्सवानिमित्त दि. २४/०१/२०२५ रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये ‘भारतीय संविधान‘ या विषयावर विद्यार्थिनींनी रांगोळ्या सादर केल्या. यामध्ये रोशनी सरदेसाई (टी. वाय. बी. कॉम)प्रथम क्रमांक, कलिका जाधव व सज्ञानी घागरे (एस. वाय.बी. ए.) व्दितीय क्रमांक, दिक्षा गांगण (एस.वाय.बी.कॉम.) तृतीय क्रमांक, व आरसीन गडकरी, जागृती गुरव, इतिशा जाधव (टी. वाय. बी. कॉम) चतुर्थ क्रमांक देण्यात आला.

८) दि. ०८/०३/२०२५ रोजी ‘आंतरराष्ट्रीय महिला दिन’ मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त महाविद्यालयातील ग्रंथालय परिचारिका सौ. स्नेहा कोलते यांचे ‘आजची स्त्री' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला.




संगणक व टेलरिंग या कोर्सेच्या उद्घाटन प्रसंगी टेलरिंग प्रशिक्षक एम.डी.देवरुखकर यांना सन्मानित करताना प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम




आयोजित रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. जगदिश पाटील




महावियालायातील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.




दि.२२/०१/२०२५ रोजी रस्ता सुरक्षा अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सौ. राजश्री पाटील मॅडम (सिनिअर मोटार निरीक्षक, रत्नागिरी)




महिला विकास कक्षामार्फत दि.२४/०१/२०२५ रोजी महाविद्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या संविधान गौरव महोत्सवानिमित्त रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी 'आजची स्त्री' या विषयावर मार्गदर्शन करताना सौ. स्नेहा कोलते

# ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

❖ **डॉ. प्रमोद एस. मेश्राम,** प्राध्यापक / प्र. प्राचार्य -

१) मुंबई विद्यापीठ अंतर्गत वेगवेगळ्या कॉलेजच्या कॅस कमिटीवर कुलगुरू प्रतिनिधी म्हणून नेमणूक.

२) पिअर रीव्हीव्ह इंटरनॅशनल मल्टीडीसीप्लीनरी रिसर्च जर्नल आयडील मध्ये 'जनजातीयों की परंपरा एवंम विद्रोह' या आशयाचा संशोधन रिसर्च पेपर खंड ८ मध्ये सप्टेबर ते फेब्रुवारी यामध्ये प्रकाशित झाला. (ISSN 2319-359X Impact Factor 7.537)

३) मुंबई विद्यापीठ, मुंबई येथील इतिहास विभाग येथे रिसर्च सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नेमणूक.

४) कणकवली कॉलेज कणकवली येथील इतिहास विभागाला पीएच. डी. ला मान्यता देण्यासाठी लोकल कमिटीवर नेमणूक.

५) श्री. मनोहर हरी खापणे कॉलेज व आंबेडकराईड हिस्ट्री असोशियसन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या राष्ट्रीय परिषदेत दिनांक २० मार्च ते २३ मार्च २०२५ या तीन दिवशीय परिषदेत The Impact of Technology on Historical Preservation: Challenges and Innovations या विषयावरील संशोधन पेपर रिसर्च स्टडीज जर्नल आय.एस. एस. एन. २२७७-८३९x मध्ये प्रकाशीत झाला.

## ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

❖ **संजय वसंत निंबाळकर,** हिंदी विभाग प्रमुख

१) दि. १५/०६/२०२४ रोजी लांजा कॉलेज, लांजा येथे एन.ई.पी.कार्यशाळेसाठी उपस्थित.

२) दि. ०८/०१/२०२५ रोजी "स्कूल कनेक्ट अभियान" अंतर्गत 'अर्जुना माध्यमिक विद्यालय, कारवली येथे विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान..

३) दि. ११/०१/२०२५ रोजी "स्कूल कनेक्ट अभियान" अंतर्गत 'शारदा विद्यालय, आजिवली येथे विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान..

४) महाविद्यालयात दिनांक १६/०१/२०२५ ते १८/०१/२०२५ या कालावधीत 'क्रीडा महोत्सवाचे' आयोजन केले.

५) दि. ०८/०३/२०२५ रोजी आनंदीबाई रावराणे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, वैभववाडी महाविद्यालयामध्ये 'Representation and Empowerment of Women in Marathi, Hindi and English Literature' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत सहभाग घेऊन "हिंदी कथा साहित्य में स्त्री विमर्श" या विषयाच्या शोध निबंधाचे वाचन केले

६) दि. २०/०३/२०२५ रोजी श्री मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, पाचल महाविद्यालयामध्ये एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत सहभाग.

# ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

## ❖ डॉ. व्ही. एस. पाटील

१) दि. १४ जून २०२४ रोजी 'कला ,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,लांजा आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ' या विषयावरील कार्यशाळेत सहभाग.

२) दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे यांच्यामार्फत आदर्श प्राध्यापक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

३) दि. ३०/०८/२०२४ रोजी टीबीके कॉलेज, भरणे नाका (खेड) आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या प्लॅनिंग सेशनमध्ये सहभाग.

४) दि. ३०/११/२०२४ रोजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांजा आयोजित एलटीपी शिबिरात ' शिबिरातील संस्कार ' या विषयावर मार्गदर्शन केले.

५) जिजामाता हायस्कूल, रायपाटण, गांगो रवळनाथ हायस्कूल, जवळेथर, कै. आत्माराम आयरे विद्यालय, मिळंद येथे स्कूल कनेक्ट अभियान अंतर्गत मार्गदर्शन केले.

६) भारतीय ज्ञान प्रणाली या ग्रंथात 'भारतीय ज्ञान परंपरेत वारकरी संप्रदायातील संतांचे योगदान' हा शोध निबंध प्रकाशित झाला.

७) साहित्यगंध या शब्दालय प्रकाशनच्या ग्रंथात 'आप्त' अंतपटलावर उमटलेल्या व्यक्तींचे भावतरंग हा शोध निबंध प्रकाशित झाला.

८) इतिहास दर्पण या यूजीसी केअर लिस्ट मासिकातून 'स्त्रीवादी दृष्टिकोनातून लोकसाहित्याची मांडणी करणाऱ्या विदुषी डॉ.तारा भवाळकर' हा शोध निबंध प्रकाशित झाला.

९) दि. ९ जानेवारी २०२५ रोजी डी.जे. सामंत कॉलेज,पाली आयोजित विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात 'शिबिर आणि आजचा युवक' या विषयावर व्याख्यान दिले.

१०) दि. १३ जानेवारी २०२५ रोजी आबासाहेब मराठे महाविद्यालय, राजापूर आयोजित विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात ' शिबिरातून होणारा व्यक्तिमत्व विकास ' या विषयावर व्याख्यान दिले.

११) दि. १ व २ फेब्रुवारी २०२५ रोजी वाटुळ येथे राजापूर, लांजा तालुका नागरिक संघ आयोजित दोन दिवशीय ग्रामीण साहित्य संमेलनात सहभाग

१२) दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी आबासाहेब मराठे महाविद्यालय, राजापूर आयोजित 'साहित्य, समाज आणि संस्कृती' या विषयावरील एकदिवशीय राष्ट्रीय चर्चासत्रात तज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

१३) दि. २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी गुरुकुल महाविद्यालय खेर्डी आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्क्रुटणी सत्रात सहभाग घेतला.

१४) दि. २० मार्च २०२५ रोजी श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालय आयोजित एकदिवशीय राष्ट्रीय परिषदेत 'जागतिकीकरणाचा स्थानिक साहित्यावर झालेला परिणाम' हा शोध निबंध सादर केला.

# ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

## ❖ डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील

१) आजीवन जीवन अध्ययन आणि विस्तार कार्य विभागाच्या प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी खारेपाटण महाविद्यालय या ठिकाणी दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी उपस्थिती.

२) दि. ८ जानेवारी २०२५ रोजी माध्यमिक विद्यालय ताम्हाणे या ठिकाणी स्कूल कनेक्ट अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

३) काळेश्वर विद्यालय आणि जुनियर कॉलेज मूर या ठिकाणी स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दि. १० जानेवारी २०२५.

४) Journal of Research Studies या आंतरराष्ट्रीय रिसर्च नियतकालिकामध्ये **कोकणातील समाजसेविका इंदिराबाई हळबे** हा शोधनिबंध प्रसिद्ध झाला.

५) श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालयाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये एकविसाव्या शतकातील इतिहास संशोधकांची भूमिका या शोधनिबंधाचे वाचन केले.

६) Power of Knowledge या नियतकालिकामध्ये **मातृमंदिरच्या संस्थापिका इंदिराबाई हळबे मावशी** हा शोधनिबंध प्रसिद्ध झाला.

## ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

### ❖ प्रा. डॉ. बळवंत दाभाडे -

१) दि. १५ जून २०२४ रोजी लांजा महाविद्यालय, लांजा येथे **'नवीन शैक्षणिक धोरण'** या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये सहभाग.

२) दि. १३/०१//२०२५ रोजी माध्यामिक विद्यामंदिर, सौंदळ येथे स्कूल कनेक्ट अभियान व नविन शैक्षणिक धोरण (NEP) अंतर्गत आठवी, नववी, दहावी या वर्गांतील विद्यार्थ्यांना **'नवीन शैक्षणिक धोरण'** या विषयावर मार्गदर्शन.

३) दि. १३/०१/२०२५ रोजी स्कूल कनेक्ट अभियान व नविन शैक्षणिक धोरण (NEP) अंतर्गत विद्यानिकेतन, येळवण येथे आठवी, नववी, दहावी या वर्गातील विद्यार्थ्यांना **'नवीन शैक्षणिक धोरण'** या विषयावर मार्गदर्शन.

४) श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल-रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

५) आय.क्यु.ए.सी.मराठी, हिंदी, इंग्रजी इतिहास व कॉमर्स विभाग आणि आंबेडकराईट हिस्ट्री असोसिएशन मुंबई आयोजित **'२१व्या शतकातील संशोधनाचा दृष्टिकोन'** या विषयावरील एक दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेत **'जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव'** ह्या संशोधन लेखाचे सादरीकरण.

६) २१ ऑक्टोबर २०२४ रोजी शाम गडाले कला व विज्ञान महाविद्यालय, दहिफल जि. बीड या महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत **'इरावती कर्वे : शैक्षणिक व सामाजिक कार्य'** या विषयावर संशोधन लेख सादर व इतिहास दर्पण, युजीसी केअर लिस्टेड जर्नलमध्ये संशोधन लेख प्रकाशित.

७) दि. ५ जून २०२४ रोजी **'वैचारिक गद्य'** या ग्रंथाचे प्रकाशन.

# ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

❖ **प्रा. एस. एस. धोंगडे,** हिंदी विभाग -

१) दि. १४ जून २०२४ व दि. १५/०६/२०२४ रोजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांजा आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020)' या विषयावरील कार्यशाळेत सहभाग.

२) १ ऑगस्ट २०२४ रोजी सांस्कृतिक विभाग आयोजित लोकमान्य टिळक पूण्यतिथी व लोकशाहीर अण्णाबाऊ साठे जयंती निमित्त आयोजित कार्यक्रममात 'लोकमान्य टिळक व लोक शाहिर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन व कार्य' या विषयावार व्याख्यान दिले.

३) दि. २० डिसंबर २०२४ रोजी मुंबई विद्यापीठाच्या स्कूल कनेक्टिव्हिटी कार्यक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नेर्ले-तिरवडे येथे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020)' या विषयावार व्याख्यान दिले.

४) दि. १४ जानेवारी २०२५ रोजी मुंबई विद्यापीठाच्या स्कूल कनेक्टिव्हिटी कार्यक्रमांतर्गत रामेश्वर विद्यालय, कोंडगे, ता. लांजा येथे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020)' संबंधी मार्गदर्शन केले.

५) दि. १५ जानेवारी २०२५ रोजी मुंबई विद्यापीठाच्या स्कूल कनेक्टिव्हिटी कार्यक्रमांतर्गत सरस्वती विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेज, रिंगणे, ता. लांजा येथे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020)' संबंधी मार्गदर्शन केले.

६) दि. २५ जानेवारी २०२५ रोजी मुंबई विद्यापीठाच्या स्कूल कनेक्टिव्हिटी कार्यक्रमांतर्गत आदर्श विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेज, वाटूष ता. राजापूर येथे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020)' संबंधी मार्गदर्शन केले.

७) दि. २० मार्च २०२५ ते २३ मार्च २०२५ रोजी श्री मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ आर्टस एन्ड कॉमर्स, पाचल आयोजित तिन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत दि. २१ मार्च २०२५ रोजीच्या पहिल्या सत्रातील कार्यक्रमात कार्यक्रम सत्राध्यक्ष म्हणून काम पाहिले व मार्गदर्शन केले.

# ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

## ❖ श्री. नंदकुमार गोविंद देवण

1) Participated in one day workshop organised by UGC and Savitribai Phule University Pune at Savitribai Phule University Pune on 17th March 2025.
2) Participated in 3 days National Conference organised by Shri Manohar Hari College of Arts and Commerce, Pachal and Dr. Ambedkarite History Association, Mumbai from 20th March to 22nd March 2025.
3) Participated in ABC ID workshop organised by University of Mumbai at Gogate-Jogalekar College Ratnagiri on 24th October 2024.

# ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

## ❖ डॉ. मनोहर रामुलू कोंडागुर्ले, ग्रंथपाल

Research Paper and Participation in Seminars/Workshops/ Conferences/ Webinars.

1) Article entitled "Indian Women in Media: Shaping the Narrative of Empowerment" Published in Itihas Darpan- UGC CARE Listed Journal, ISSN-0974-3065, Vol. 5, on 21st Oct. 2024.
2) Book Chapter entitled "Strategic Digital Transformation in Libraries: Integrating Virtual Resources for Enhanced Academic Services" Published in the book of 'The Evolving Library Future Trends & Interdisciplinary Perspectives', ISBN: 978-81-975949-0-8.
3) Article entitled as Co-Author "The Role of Artificial Intelligence in Enhancing Information Retrieval Systems in Academic Libraries" Published in Scopus Indexed Library Progress International, Vol.44 No.3, Jul-Dec 2024: P. 22526-22541, ISSN- 2320 317X.
4) Article entitled "The Impact of Artificial Intelligence on Library Services: Opportunities and Challenges" Published in Journal for Research Studies, A Peer Reviewed, Refereed, Biannual International Interdisciplinary Research Journal, ISSN- 2277-839X.
5) Participated in National Level Seminar on "Women as a Pillar of Resistance: Celebrating Bravery and Empowerment" organized by Shyam Gadale Arts and Science College, Dahiphal, held on 21/10/2024.
6) Participated and Presented research paper in National Conference on "Education, Culture, History Literature, Law and Society: A Perspective of Research in 21st Century" organized by Shri. M. H. Khapane College of Arts and Commerce, Pachal and Ambedkrite History Association, Mumbai, held on 20/03/2025.

## ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

### ❖ **पी. पी. राठोड,** सहा. प्राध्यापक

1) Participate in one day workshop on New Education Policy organised by ACS College Lanja dated on 15 June 2024.
2) Participated at Two Days Inter-national Conference on Multidisciplinary Research in Tribal development jointly organized by Dev Sanskriti Vishwavidyalaya, Sankara Kumhari, Durg (Chhattisgarh), SSMWA, Social Science Managment Welfare Association and Youth Economic Association. Dated on 10-11 Augest 2024.
3) Artical Entitled 'Present Economical Scenario of Various Indian Tribes' in Peer Reviewed & Refereed Journal, ISSN ISSN: 2454-4655, Impact factor 5.2, in Augest 2024.
4) Presented Article Entitled 'Empowering Women in the Indian Economy: A Catalyst for New Growth'in Etihas Darpan UGC listed Journal ISSN: 0974-3065 in Oct 2024.
5) Participated in the Online Two Days National Interdisciplinary Seminar on Indian Knowledge System : Renaissance of Indian Culture organised by Shri Havagiswami Mahavidhyalaya, Udgir held on 30-31/08/2024.
6) Under the initiative of Mumbai University succesfully organised School Connect 2.0 initiative as in the arts and commerce High School Vatul and Oni.
7) Participated in the Three Day National Multidisciplinary Conference on Education, Literature, Law and Society : A Perspective of Research in 21st Century organised by I.Q.A.C. and Department of History, Marathi,Hindi, English, Commerce and Library Shri Manohar Hari Khapane College of Arts and Commerce Pachal held on 20-23 March 2025.
8) Presented Artical Entitled 'Ecotourism and its Intervention in the Rural Labour Market of Ratnagiri District of Maharashtra' Peer Reviewed & Refereed Journal, ISSN 2277-839X.
9) Participated in the One Day National Webinar on Chhatrapati Shivaji Maharaj's Administratvie system : A Model of Good Governance organised by Department of poltical science and History of Shri Vyankatesh Arts, Commerce, and Science College held on 03 April 2025.
10) Participated in the Two Day National Multidisciplinary Conference on Basics of Research Methodology and Use of AI Tools organised by Shri Vyankatesh College Deulgaon Raja held on 8-9 April 2025.

## ◈ वैयक्तिक अहवाल २०२४-२०२५ ◈

❖ **स्नेहल गोविंद चव्हाण,** सहा. प्राध्यापक

१) दि. १४/०६/२०२४ ते १५/०६/२०२४ रोजी UGC मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग सेंटर मुंबई विद्यापीठ आयोजित दोन दिवशीय कार्यशाळा आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज लांजा येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये सहभाग.

२) शाम गडाळे आर्ट्स, सायन्स कॉलेज बीड यांच्यामार्फत आयोजित कार्यशाळेमध्ये '**संरक्षण दलातील महिला : आरंभापासून नेतृत्वापर्यंत'** या विषयावर UGC केअर लिस्टेड जर्नल ISSN 0974-3065 मध्ये शोध निबंध प्रकाशित करण्यात आला.

३) श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय पाचल - रायपटण आयोजित तीनदिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये '**शस्त्रास्त्रेनिर्मितीमधून भारताची स्वावलंबाकडे वाटचाल**' या विषयावर पिअर रिव्हयू ISBN मध्ये शोध निबंध प्रकाशित.

४) महाविद्यालयातील संस्कृतिक विभाग आयोजित सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जयंती निमित्त '**डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांचे कार्य'** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे '**सामाजिक कार्य'** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

६) श्री. सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर रिंगणे व श्री रामेश्वर माध्यमिक विद्यामंदिर कोंडगे येथे 'स्कूल कनेक्ट अभियान' अंतर्गत नवीन शैक्षणिक धोरण २०२० बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# ◈ नॅक पिअर टिम सन २०२५ भेटी वेळची निवडक क्षणचित्रे ◈


















# ◈ नॅक पिअर टिम सन २०२५ भेटी वेळची निवडक क्षणचित्रे ◈











"दि. २० ते २२ मार्च २०२५ रोजी शिक्षण, संस्कृती, इतिहास, साहित्य, कायदा आणि समाज : २१व्या शतकातील संशोधनाचा दृष्टीकोन" या विषयावर बहुविषयक तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले त्याची काही क्षणचित्रे















